# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण २०, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १२०**

---

**राज्यात विशेषत: मराठवाड्यातील लातूर, बीड, उस्मानाबाद, परभणी जिल्ह्यात तसेच विदर्भात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याबाबत**

**(१) * ११११५७ श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंद ठाकूर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र जैन, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अनिल भोसले, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मराठवाड्यातील लातूर, बीड, उस्मानाबाद, परभणी जिल्ह्यात तसेच विदर्भात सन २०१५ मध्ये अपुरा पाऊस, नापिकी, अवकाळी पाऊस, गारपिट यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊन तसेच बँका आणि सावकारी कर्ज यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यल्प पावसामुळे खरीप हंगाम पुर्णपणे नष्ट होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील ७७८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असून त्यापैकी ४७४ शेतकरी मदतीस पात्र ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतकरी, अवर्षणग्रस्त भागाला दिलासा देण्यासाठी दुष्काळी तालुके जाहीर करणे, खरीपाच्या नुकसानीची झालेल्या पंचनाम्यानुसार भरपाई देणे यासह विविध मागण्या परभणी-हिंगोली येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने दुष्काळ जाहीर केलेला नसल्यामुळे तसेच दुष्काळी उपाययोजना, शेतकऱ्यांना दिलासा न दिल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. तसेच दुष्काळामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत व पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, विदर्भ तसेच मराठवाड्यातील ६४ तालुक्यांपैकी बीड, उस्मानाबाद, लातूर, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यातील ३८ तालुके दुष्काळग्रस्त असून तेथील शेतकरी मुंबई, पुणे, ठाणे यासारख्या शहरात स्थलांतरीत होत असून यापैकी काही कुटूंबे रेल्वे स्टेशनवर गुजराण करीत असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता बळीराजा अभियान राबविण्याबाबत तसेच उपाययोजनांची अंमजबजावणी करण्यासाठी स्वतंत्र महासंचालनालय स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) औरंगाबाद विभागात ९७५ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या असून त्यापैकी ५९० प्रकरणे मदतीस पात्र ठरलेली असून त्यांना मदत वाटप करण्यात आली आहे. उर्वरित प्रकरणात चौकशी सुरु आहे.

(३) होय.

(४) राज्यात सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी मध्ये ज्या गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आली आहे अशा १५७४७ गावांमध्ये दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहिर करुन त्याअनुषंगाने विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना रु.१.०० एवढे सानुग्रह अनुदान देण्यात येते.

(५) विदर्भामध्ये शेतकरी स्थलांतरणाची बाब निदर्शनास आली नाही.

औरंगाबाद बीड जिल्हयातील काही कुटुंब ऊस तोडणीसाठी इतर जिल्हयातील साखर कारखान्यात गेलेली आहेत. इतर ठिकाणी स्थलांतर झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(६), (७) व (८) राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी बळीराजा अभियान राबविणे तसेच उपाययोजनांची अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुर्नरचना करण्यात आली आहे.

-----------------

**कोकणातील गौण खणिज उत्खन्न व्यवसाय धोक्यात आले असल्याबाबत**

**(२) * ११२९७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात सुरु असलेले गौण खणिज उत्खन्न व्यवसाय शासनाच्या जाचक अटीमुळे धोक्यात आला असल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गौण खनिज उत्खनन या व्यवसायावर घालण्यात आलेल्या जाचक अटी शिथील करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) केंद्र शासनाने रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यात अधिस्थगन (Moratorium) लागू केल्याने गौण खनिज उत्खननास बंदी होती. त्यानंतर केंद्र शासनाने २०१३ मध्ये अधिस्थगन उठविल्यानंतर रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील पर्यावरणदृष्ट्या संवदेनशिल गावे वगळून उर्वरीत भागात गौण खनिज उत्खननास परवानगी देण्यात येत आहे.

तसेच मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने एका प्रकरणात कोकण विभागातील सागरी किनारपट्टी क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती उत्खननासंदर्भात पारित केलेल्या आदेशाचा परामर्श घेवून, शासनाने याबाबतचे सविस्तर धोरण दिनांक २१.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केले असून, सदर धोरणातील तरतुदीनुसार कोकण विभागातील वाळू/रेती उत्खननासाठी परवानगी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## रायगड जिल्हयात महसूल विभागातील अनुसूचित जमातीच्या संवर्गातील उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत

**(३) * ११९८५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील महसूल विभागात अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र सादर करुन तलाठी व अन्य संवर्गात नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी अनुसूचित जमातीत असल्याचे जात वैधता होत नसल्याने विशेष मागास प्रवर्गाची जात वैधता प्रमाणपत्रे सादर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही कर्मचाऱ्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १५ जून, १९९५ च्या परिपत्रकानुसार सदर व्यक्ती विशेष मागास प्रवर्गात मोडत असल्याचे ज्ञात असूनही अनुसूचित जातीच्या प्रमाणपत्राद्वारे नियुक्ती मिळवून शासनाने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केल्यानंतर विशेष मागास प्रवर्गाची जात वैधता प्रमाणपत्रे कार्यालयाकडे सादर केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही पध्दतीने जून, १९९५ ते सन २००० पर्यंत किती व कोणत्या कर्मचाऱ्यांच्या व केव्हा नियुक्त्या करण्यात आल्या, त्यापैकी किती व कोणत्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली याबाबतचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही पध्दतीने नियुक्ती मिळविलेल्या कर्मचाऱ्यांमुळे मूळ अनुसूचित जमाती संवर्गात मोडणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त दोन्ही पध्दतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी शासनाची फसवणूक केल्यामुळे तसेच त्यांच्यामुळे अनुसूचित जमाती या संवर्गातील जागा कायम स्वरुपी अडविली गेल्यामुळे माहे जून, १९९५ नंतर अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र सादर करुन नियुक्ती मिळविलेल्या विशेष मागास प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याबाबत तसेच सदर पदांवर मूळ अनुसूचित जमातीतील उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) रायगड जिल्हयातील महसूल विभागात अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्ती दिलेल्या तलाठी व अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांची संख्या ७२ आहे. त्यापैकी ६० कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी समितीने वैध ठरविले असून ४ अवैध ठरविले आहेत. आणि ८ कर्मचाऱ्यांचे पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या १ अव्वल कारकून, १ मंडळ अधिकारी व १ लिपिक-टंकलेखक

संवर्गातील कर्मचाऱ्यांनी विशेष मागास प्रवर्ग जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केले असून, प्रचलित शासन निर्णयानुसार त्यांना त्यांच्या मूळ नियुक्तीच्या पदावर दिनांक १५.०६.१९९५ ची जेष्ठता देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात जून १९९५ ते २००० पर्यत अनुसूचित जमातीचे तलाठी व अन्य संवर्गातील एकूण ६ कर्मचारी नियुक्त झालेले असून जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्यापैकी १ लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांचे प्रमाणपत्र वैध तर तलाठी संवर्गातील ४ कर्मचाऱ्यांपैकी २ कर्मचाऱ्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरविले आहे. उर्वरित २ तलाठी आणि १ वाहन चालक यांचे दावे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. सदर जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अथवा जात प्रमाणपत्राची अद्याप पडताळणी न झालेल्या एकाही कर्मचाऱ्यास पदोन्नती देण्यात आलेली नाही.

अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या २ तलाठी कर्मचाऱ्यांपैकी एका कर्मचाऱ्याचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अनुसूचित जमाती पडताळणी समितीने दिनांक २९.१.२०१३ च्या आदेशान्वये अवैध ठरविले आहे. यास्तव सदर कर्मचाऱ्यास दिनांक २८.०५.२०१३ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून बडतर्फ केले आहे. दुसऱ्या तलाठी कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अनुसूचित जमाती पडताळणी समितीने दिनांक १५.९.२०१५ च्या आदेशान्वये अवैध ठरविले आहे. परंतू, सदर कर्मचाऱ्याबाबतीत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१.१०.२०१५ रोजीच्या परिपत्रकामधील तरतूदीनुसार संरक्षण प्राप्त झाले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**एसएनडीएल कंपनीची चौकशी होण्याबाबत**

**(४) * ११०४० श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसएनडीएल कंपनी स्पॅनको संबंधी जनतेने तक्रार केल्यानंतर सत्यशोधन समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात वितरणचे काम एसएनडीएल कंपनीमार्फत होते आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, एसएनडीएल कंपनीचे सत्यशोधन समिती चा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(४) एसएनडीएल द्वारा अनेक अटींचे उल्लंघन झाले असे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) नागपूर वितरण फ्रॅन्चाइझी करारातील तरतुदीनुसार एस.एन.डी.लिमीटेडवर महावितरण कंपनीकडून कारवाई करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील तोट्यात चाललेल्या एसटी महामंडळाला सक्षम करण्याबाबत**

**(५) * ११२३२ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गाव खेड्यांपर्यंत जाणाऱ्या एसटीच्या प्रवाश्यांची संख्या कमी झाली असून वर्षभरात ११ कोटी ३२ लाख प्रवाशांनी एसटीतून प्रवास करणे बंद केले असल्याने एसटी महामंडळ गेल्या काही वर्षापासून तोट्यात जात असून आर्थिकस्थिती खालावली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी महामंडळातील गैरकारभार, अवैध वाहतूक, डिझेल-टायर-सुट्या भागांचे दर, तोट्याचा वाढणारा आकडा, सक्षम अधिकाऱ्यांची वानवा, प्रवाशांची घटती संख्या, शासनाकडून एसटीला विशेष सहाय्य मिळत नसणे या कारणाने एसटी महामंडळ तोट्यात जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची दखल घेऊन एसटी महामंडळाला सक्षम करण्यासाठी विशेष निधी तरतूद करून तोट्यात चालणारे महामंडळ फायद्यामध्ये कसे येईल याबाबत तसेच प्रवाशांनी एसटीतून प्रवास करावा यासाठी प्रोत्साहन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) सन २०१३-१४ च्या तलुनेत सन २०१४-१५ मध्ये प्रवासी संख्येत ११.०१ कोटीने घट झालेली असून सदरची घट ही अवैध वाहतुकीमुळे तसेच खाजगी वाहतुकदार रा.प.च्या तुलनेत कमी प्रवास भाड्यात प्रवासी वाहतूक करत असल्याने झालेली आहे.

राज्य परिवहन महामंडळातर्गत दर चार वर्षांनी होणारा कामगार करार, डिझेल व इतर भांडार सामानाच्या किंमतीत सतत होणारी वाढ, दर सहा महिन्यांनी महागाई भत्यातील वाढ इ. कारणांमुळे गेल्या काही वर्षापासून राज्य परिवहन महामंडळ तोट्यात आहे.

राज्य परिवहन महामंडळाचे भारमान, उत्पन्नामध्ये वाढ व खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने राज्य परिवहन महामंडळाद्वारा सुचना देण्यात आल्या असून उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रवासी वाढवा योजना, नैमित्तिक कराराच्या अटीमध्ये बदल, हिरकणी सेवेत आरामदायी आसन व्यवस्था, नविन वातानुकलित शिवनेरी बसेसची खरेदी, सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतुकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी समाजातील २४ विविध घटकांना प्रवास भाड्यात सवलत, वार्षिक सवलत कार्ड, मासिक/त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देऊन प्रवासी व उत्पन्न वाढीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर उपाययोजना करण्यात येत आहे.

सन २०१३-१४ मध्ये महामंडळाला रु. ५७२.६२ कोटी असलेला तोटा सन २०१४-१५ च्या अलेखापरिक्षित वार्षिक लेख्यानुसार रु. ३८२.१३ कोटी एवढ्यावर आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत**

**(६) * ११५८८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंद ठाकूर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात सन २००१ ते जून, २०१५ अखेर केवळ ५ ते १० हजार रूपयांच्या कर्जासाठी सुमारे २८० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) यवतमाळ जिल्ह्यात सन २००१ ते जून, २०१५ या कालावधीत एकूण ३२३६ शेतकरी आत्महत्येची प्रकरणे आढळून आली असून त्यापैकी १३३७ शेतकरी आत्महत्या पात्र ठरल्या व १८९९ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. पात्र आत्महत्या प्रकरणी त्यांच्या वारसांना रु. १.०० लक्ष ची मदत देण्यात आली आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २०१५ (भाग-१) व (भाग-२) अन्वये राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्याकरीता पथदर्शी प्रकल्प म्हणून विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्हास्तरीय व ग्रामस्तरीय समित्या तसेच बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त करण्यासाठी विविध विभागांमार्फत कार्यक्रम राबविण्यासाठी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आदिवासीच्या जमिनी नियमबाह्यरित्या विक्रीचा निर्णय रद्द करण्याबाबत**

**(७) * १२१५८ श्री.हेमंत टकले, श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंद ठाकूर, श्री.सतिश चव्हाण, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जमीन महसूल अधिनियम १९८८ च्या कलम ३६ अ नुसार तसेच १९७५ च्या कायद्यान्वये आदिवासी जमीन बिगर आदिवासींना विकण्यास निर्बंध असतांनाही राज्यातील मुंबई, ठाणे, औरंगाबाद, दिघी, नाशिक-सिन्नर-इगतपूरी आणि रायगड जिल्ह्यातील २६७ आदिवासींची सुमारे १० लाख एकर जमीन बिगर आदिवासींनी नियमबाह्यपणे बळकावली आहे असे शासनाच्या जनजाती परिषदेच्या अहवालात स्पष्ट झाले असताना शासनाने कायद्यात बदल करुन आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना विकण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयास अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे कार्याध्यक्ष तथा माजी मंत्री तसेच आदिवासी लोकप्रतिनिधींनी विरोध करीत मा.राज्यपाल यांना आपल्या मागण्याबाबतचे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१३ पासून आदिवासींच्या जमीन विक्रीच्या प्रकरणात १० टक्के वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील नियमबाह्यरित्या विकलेल्या आदिवासींच्या जमिनी परत घेऊन त्यांच्या जमिनींना कायद्याचे संरक्षण देणे तसेच आदिवासींच्या जमिनी खुल्या करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम-३६अ अन्वये आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना बिनशेती प्रयोजनासाठी शासनाच्या पूर्व परवानगीने हस्तांतरणास परवानगी देण्याचे तरतूद आहे. उक्त कलमान्वये तसेच, महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करणे, अधिनियम, १९७४ आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम-३६ आणि ३६अ मधील तरतूदीनुसार नियमबाह्यरित्या हस्तांतरीत झालेल्या आदिवासींच्या जमिनी परत करण्याची तरतूद आहे.

या तरतूदीच्या अनुषंगाने पूर्वी वेळोवेळी प्रकरणेपरत्वे गुणवत्तेवर निर्णय घेऊन आदिवासी जमीनधारकांच्या जमिनी बिगर आदिवासींना जमीन हस्तांतरणास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार समितीच्या ४८ व्या बैठकीमध्ये आदिवासींच्या जमिनींचे बिगर आदिवासांना होणारे हस्तांतरण रोखण्यासाठी इतर राज्यात असलेल्या कायद्याची तपासणी करुन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये योग्य तो बदल करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन समितीच्या अहवालावर निर्णय होईपर्यत नवीन हस्तांतरांचा प्रस्ताव नोंदवू नये या स्वरुपाचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुषंगाने आदिवासी विकास विभागाने शासन निर्णय क्र.जजाप-२०१४/प्र.क्र.७७/का.१४, दि.११.६.२०१४ अन्वये समिती नेमली होती व महसूल विभागाने अशा कलम-३६ अ खालील तरतूदीप्रमाणे जमीन हस्तांतरण करण्यास परवानगी देण्याचे थांबवले होते. सदर समितीने त्यांचा अहवाल आदिवासी विकास विभागाकडे सादर केला आहे.

दरम्यानच्या कालावधीमध्ये आदिवासींच्या जमिनींच्या हस्तांतरणास परवानगी देण्याबाबत तसेच परवानगी न देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी तसेच इतरांची निवेदन शासनाकडे प्राप्त झालेली आहेत.

सदर समितीने सादर केलेल्या अहवालाची छाननी करण्यात येत असून त्यामधील शिफारशीच्या अनुषंगाने कायद्यात बदल करण्याचा किंवा इतर कोणताही निर्णय शासनस्तरावर घेण्यात आलेला नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयात दूध उत्पादकात घट झाल्याने शेतकरी अडचणीत आल्याबाबत**

**(८) * ११३८८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात दुष्काळ, अपुरा चारा व पाण्याअभावी एका महिन्यात १४ हजार ३०० लिटरने दूध संकलनात घट झाली आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) माहे एप्रिल ते सप्टेंबर हा दुधासाठी कृषकाळ असतो. सध्या कृषकाळ सुरु असल्याने नैसर्गिकरित्या दूध संकलनात घट होत असते. तसेच चालू वर्षी ऑगस्ट पर्यंत पाऊस उशीरा व पुरेशा प्रमाणात न पडल्याने दुष्काळ सदृष्य परिस्थिती उद्‌भवल्यामुळे दूध संकलनात काही प्रमाणात घट झालेली आहे, हे खरे आहे.
(२) व (३) दूध उत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचा शासनाने नेहमी प्रयत्न केला आहे. राज्यामध्ये निर्माण झालेली दुष्काळ परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने दिनांक ३१.७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम राबविण्यास मान्यता दिली असून त्या अंतर्गत रु.२५.०० कोटी निधी मंजूर केला आहे. तसेच हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाव्दारे हिरवा चारा उत्पादनाकरीता दिनांक १४.९.२०१५ अन्वये रु.१०.०० कोटी निधी मंजूर केला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाकरीता लाभार्थी निवडताना पशुधन असणाऱ्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्याकरीता वरील दोन्ही कार्यक्रमांतर्गत रु.२२३.५५ लक्ष निधीची तरतूद करण्यात आली आहे.

याशिवाय भविष्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांना किमान शासकीय दूध खरेदी दर प्राप्त व्हावा या उद्देशाने शासनाने निश्चित केलेले दूध खरेदीचे दर (वरकड खर्चासह) प्रमाणीत मानून राज्यातील सहकारी संघ/ संस्थांनी हाच दर शेतकऱ्यांना देणे आवश्यक असल्याबाबत सर्व सहकारी दूध संघांना दिनांक १०.७.२०१५ रोजी निदेश निर्गमित केले आहेत.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत**

**(९) * ११४७३ श्री.शरद रणपिसे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध भागांमधील १२३ तालुक्यांमध्ये माहे जानेवारी, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ या कालावधीत कमी पर्जन्यमानामुळे टंचाईसदृश्य परिस्थिती, अवकाळी पाऊस, दुष्काळी परिस्थिती, नापिकी व कर्जबाजारीपणा या कारणांमुळे २३०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील ११०० हून अधिक शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना शासनाकडून कुठलीही मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांमध्ये जऊळका रेल्वे (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील दत्ता आत्माराम लांडगे या युवा शेतकऱ्याने आपल्या चिठ्ठीमध्ये विदर्भातील शेतकऱ्यांच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप करुन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी आढावा घेऊन शासनाने जिल्हानिहाय पाहणी केली आहे काय,

(५) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शासनाने आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०१५ या कालावधीत राज्यात एकुण २२११ शेतकरी आत्महत्या निदर्शनास आल्या आहेत. सदर पात्र प्रकरणांपैकी १४५३ प्रकरणे पात्र असून आत्महत्याग्रस्ताच्या वारसांना प्रत्येकी रु.१.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(३) होय, हे खरे आहे, आत्महत्याग्रस्त कुटुंबाला अध्यक्ष, कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन तसेच अधिकारी यांनी भेट दिली असून सदर प्रकरण जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविले आहे व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसाला रु.१.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(४) आढावा घेण्यात येऊन उपाययोजना करण्याची प्रक्रिया चालू आहे.

(५) आत्महत्या केलेल्या कुटुंबांना रु.१.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात येते.

(६) शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याबाबत दिनांक २४.७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. त्याअनुषंगाने शासनाच्या विविध विभागांना उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी पथदर्शी प्रकल्प म्हणून विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद या दोन जिल्हांची निवड करण्यात आली आहे.

उपरोक्त पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी उस्मानाबाद व यवतमाळ जिल्हयातील जिल्हास्तरिय व ग्रामस्तरिय समित्यांना रु.४८८५.०० लाख इतका untied निधी मंजूर केला असून त्यापैकी रु. ३४१९.०० लाख इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) कर्ज प्रकरणामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१०) * ११७३१ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ९६६५ ला दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.कापरीदेव मच्छिमार सह. संस्था मर्यादित सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) या संस्थेस माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान किती रक्कम वर्ग केली होती,

(२) असल्यास, वर्ग करण्यात आलेल्या रक्कमेतून संस्थेने फायबर बोटी बांधण्यासाठी किती रक्कम खर्च केली आहे,

(३) असल्यास, अतिरिक्त प्रदान झालेली रक्कम संस्थेकडून वसूल करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी मा.मत्स्यव्यवसाय मंत्री महोदयांच्या आदेशाने गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) श्री.कापरीदेवी मच्छिमार सह.संस्था मर्या. सासवणे (ता.अलिबाग, जि.रायगड) या संस्थेस माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कोणतीही रक्कम वर्ग करण्यात आलेली नाही. सन २००८-०९ मध्ये रु. २७९.६३ लक्ष इतकी रक्कम वर्ग करण्यात आली असून सर्व रक्कम, संस्थेने फायबर बोटी बांधण्यास खर्च करण्यात आली आहे.

(३) अतिरिक्त प्रदान केलेल्या रु. ६०.३९ लक्ष रक्कमेतून रु. १८,३६,८६४/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) गृह विभागामार्फत गुन्हयाचा तपास चालू आहे. मत्स्यव्यवसाय विभागामार्फत संस्थेचा डिझेल कोटा व डिझेल परतावा संस्थगित करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत

**(११) * १२४६३ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३९३५ ला दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यासाठी शासनस्तरावर काय उपाययोजना करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वीज दर ठरविण्याचे अधिकार मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास असून त्यांच्या दिनांक २६.०६.२०१५ च्या आदेशानुसार राज्यातील शासकीय शैक्षणिक संस्थांसाठी सार्वजनिक सेवा वर्गवारी अंतर्गत स्वतंत्र उपवर्गवारी लागू करण्यात आली आहे. शासकीय शैक्षणिक संस्थांकरिता लागू केलेले वीज दर अन्य सार्वजनिक सेवा व वाणिज्यिक या वर्गवारीच्या तुलनेत कमी आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात भुसंपादन कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१२) * ११२६६ श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक ९९७८ ला दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्राच्या अध्यादेशातील तरतूदीनुसार भूसंपादन कायदा अंमलात आणण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने नाकारलेला भुसंपादनाचा कायदा राज्यात अंमलात आणण्यामागील कारणे काय आहेत व याबाबत राज्य शासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन त्यानुसार याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) केंद्र शासनाच्या भूसंपादन सुधारणा अध्यादेशास संमती प्राप्त न झाल्यामुळे, सदर अध्यादेश दिनांक ३१.८.२०१५ रोजी व्यपगत झाला आहे.

तथापि, केंद्र शासनाचा भूसंपादन अधिनियम, २०१३ हा राज्यात दि.१.१.२०१४ पासून अंमलात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आदिवासींच्या नावावर असलेला भूखंड खाजगी विकासकाला देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१३) * १२४८१ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राहुल नार्वेकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.राजेंद्र जैन, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :**
सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड पश्चिमेकडील (मुंबई) लिंकिंग रोड परिसरातील भूमी क्लासिक या खाजगी विकासकाच्या गृह प्रकल्पाचा मूळ भूखंड हा आदिवासीच्या नावे असलेल्या भूखंडावर असल्याने तो विकासकाने आपल्या नावावर केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आदिवासींच्या नावावर असलेला भूखंड खाजगी विकासकाला देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) दिनांक २९.२.१९९६ रोजी श्री.गणपत पांगल्या तबाली व मे.एव्होरा बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांच्यामधील झालेला करार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ अ च्या पोटकलम (१) मधील तरतुदींविरोधात असल्यामुळे त्याअंतर्गत मौ.मालाड, ता.बोरीवली स.नं. ५०४ अ (पै), न.भू.क्र. १४०६-जी/१ पै, क्षेत्र ८६१६ चौ.मी. ही मिळकत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ अ च्या पोटकलम (५) मधील तरतुदीनुसार शासनजमा करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिनांक १३.४.२०१५ रोजी आदेश पारीत केले आहेत.

(२) प्रश्नाधीन प्रकरणी शासनाची परवानगी नसताना आदिवासी जमिनीच्या व्यवहाराची नोंद अधिकार अभिलेख्यात घेण्यात आली होती काय ? असल्यास तशी नोंद अधिकार अभिलेख्यामध्ये घेण्यास कोण जबाबदार आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा, अशा सूचना शासन पत्र, महसूल व वन विभाग, दिनांक ९.७.२०१५ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना देण्यात आल्या होत्या.

(३) त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. या अहवालाच्या अनुषंगाने अधिक माहिती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून मागविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील एस.टी. महामंडळात वाहकांकडून तिकिटांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१४) * १२०४९ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.विजय गिरकर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वर्षभरात एस टी महामंडळात वाहकांकडून तिकिटांमध्ये ३०० कोटींचा अपहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरक्षा व दक्षता विभागाने सन २०१४-१५ या कालावधीत वाहकांची ३६२३ अपहारांची प्रकरणे निदर्शनास आल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कमी मनुष्यबळामुळे ही अपहार प्रकरणे उघडकीस येण्याची संख्या कमी असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) सन २०१४-१५ या कालावधीत सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत वाहकाच्या अपहाराची ३६२३ प्रकरणे व वाहतूक खात्यामार्फत २४६७ अशी एकूण ६१९० प्रकरणे उघडकीस आणली आहेत.

(३) होय.

सन २०१४-१५ मध्ये २७० वाहतूक निरीक्षक व २५८ सहा. वाहतूक निरिक्षक मार्गतपासणीसाठी कमी होते.

(४) सदर अपहार प्रकरणांची चौकशी करुन दोषी वाहकांवर राज्य परिवहन महामंडळाच्या शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रचलित पैसेवारी पध्दतीमध्ये बदल करण्याबाबत

**(१५) * ११८५३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रचलित पैसेवारी पध्दतीचा पुनर्विचार करुन नैसर्गिक आपत्ती संदर्भात केंद्र शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने अभ्यास करुन शिफारशी करण्यासाठी शासनाने दिनांक ६ एप्रिल, २०१३ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय आयुक्त, पुणे यांच्या समितीने अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने राज्यातील पैसेवारी पध्दतीमध्ये बदल करण्यासाठी कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(४) असल्यास, राज्यातील सततची दुष्काळी आणि टंचाई परिस्थिती तसेच नैसर्गिक आपत्ती याप्रसंगी शासनाने करावयाचे सहाय्य आणि मदत याबाबी ठरविणे संदर्भात पैसेवारी पध्दतीत बदल करणे आवश्यक असल्यामुळे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) राज्यात दुष्काळ जाहीर करण्यासाठी Drought Manual २००९ मधील निकषाबरोबरच पिक पैसेवारी हा निकष ग्राह्य धरुन दिनांक ३.११.२०१५ रोजी सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुण्यात ना शेती विकास क्षेत्रात (एनए) केलेल्या बांधकामांना नियमित करण्याबाबत**

**(१६) * १२३६६ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यात ना शेती विकास क्षेत्रात (एनए) केलेल्या बांधकामांना चाळीसपट दंड आकारुन सदर बांधकामे नियमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतूदी अन्वये विहित केलेल्या प्रक्रियेनुसार परवानगी न मिळविता शेत जमिनीचा अकृषिक वापर केल्यास सदर संहितेच्या कलम ४५ व महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ च्या नियम ८ नुसार अकृषिक आकारणीच्या ४० पट पर्यंत दंड वसूल करण्याची तरतूद आहे. तथापि, त्यामुळे अशी बांधकामे नियमित होत नाहीत.

पुण्यात ना शेती विकास क्षेत्रात केलेल्या अनधिकृत बांधकामांना अकृषिक आकारणीच्या ४० पट दंड आकारुन सदर बांधकामे नियमित करण्याची बाब महसूल विभागाच्या विचाराधीन नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणेबाबत

**(१७) * ११७७४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात खरीप हंगाम २०१५ दरम्यान नुकसान झालेल्या ३ लाख ९६ हजार शेतकऱ्यांची पीक आणेवारी ६७ पैशापेक्षा कमी आल्याने त्यांना मदतीसाठी जवळपास ४०० कोटी रुपयांची मदत मिळण्याबाबतचा अहवाल जिल्हा प्रशासनाने शासनाकडे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या निकषाप्रमाणे वरील शेतकऱ्यांना ४०० कोटी रुपयांची आर्थिक मदत राज्य शासनाकडून जिल्हा प्रशासनास देण्यात आली आहे काय, तसेच तालुकानिहाय मंजुर/वाटप करण्यात आलेल्या आर्थिक मदतीची थोडक्यात माहिती काय आहे,

(३) नसल्यास, सदर रक्कम जिल्हा प्रशासनास न देण्याची कारणे काय आहेत तसेच शेतकऱ्यांना पुरेशी आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्यासाठी आवश्यक निधीची मागणी हिवाळी अधिवेशन २०१५ मध्ये प्रस्तावित केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यासाठी विविध कार्यालये व अधिकारी उपलब्ध नसल्याबाबत

**(१८) * १२६०५ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा अस्तित्वात येऊन एक वर्ष पूर्ण झाले परंतू एका वर्षात पालघर जिल्ह्याची काही प्रगती झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील शासकीय कार्यालये भाड्याच्या इमारतीत सुरू आहे, तेथे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे, अनेक कार्यालयाची कामे अजूनपर्यंत ठाणे कार्यालयातच सुरू आहेत, कर्मचाऱ्यांच्या नेमणूका अजूनपर्यंत झालेल्या नाहीत, त्यामुळे शासकीय कामकाज अडचणीचे व विलंबाने होत आहे, कर्मचाऱ्यांचे पगार व निवृत्तवेतन मिळायला उशीर होत आहे, अशा अनेक अडचणी नवीन निर्माण झालेल्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन पालघर जिल्ह्यासाठी उपशिक्षणाधिकारी, जिल्हास्तरीय विस्तार अधिकारी, अधिक्षक व अन्य कार्यालयीन कर्मचाऱ्यांची किती पदे रिक्त आहेत,

(४) असल्यास, पालघर जिल्ह्याच्या प्रगतीसाठी शासनाने कोणकोणत्या योजना हाती घेतल्या आहेत व त्यापैकी कोणकोणत्या योजनांची कामे पूर्ण झाली आहेत, कोणकोणत्या योजनांची कामे प्रगतीपथावर आहे,

(५) असल्यास, शासनाने दिलेल्या निर्देशानुसार व मा.राज्यपाल महोदयांच्या आदेशानुसार या आदिवासी जिल्ह्यातील सर्व पदे प्राधान्याने भरणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नवीन पालघर जिल्हयाची प्रगती होण्यासाठी शासकीय कामकाजामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** : (१) व (२) दिनांक १/८/२०१४ रोजी पालघर जिल्हा निर्मितीनंतर जिल्हा मुख्यालयी विविध शासकीय विभागांची कार्यालये शासकीय व भाड्याच्या इमारतीत सुरु आहेत. पालघर जिल्ह्यासाठी विविध संवर्गाच्या शासनमान्य आकृतीबंधाप्रमाणे नविन पदे निर्माण करण्याची कार्यवाही अनेक विभागात पुर्ण झाली असून उर्वरित विभागासाठी सदर कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे रिक्त पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही संबंधित विभागामार्फत सुरु आहे. शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते विहित वेळेत प्राप्त व्हावे यासाठी सेवार्थ व शालार्थ संगणक प्रणाली सुरु करण्यात आली असून सेवानिवृत्ती वेतनाचे लाभही देण्यासाठी ऑनलाईन प्रणाली सुरु करण्यात आली आहे.

(३) पालघर जिल्ह्यासाठी उपशिक्षणाधिकाऱ्याच्या ३ मंजूर पदांपैकी १ पद भरले असून २ पदे रिक्त आहेत. विस्तार अधिकारी व अधिक्षकांची पदे मंजूर/वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) पालघर जिल्ह्यासाठी नवीन मुख्यालयाचे सुनियोजित बांधकाम करण्याच्या दृष्टीने विविध उपलब्ध पर्यायांचा अभ्यास करुन निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. दरम्यान पालघर जिल्ह्यात अन्य जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या सर्वसाधारण व आदिवासी विकासाच्या सर्व योजना विविध विभागांमार्फत राबविण्यात येत आहेत.

(५) हे खरे आहे.

(६) पालघर जिल्ह्यातील विविध योजना परिणामकारकरित्या राबविण्यासाठी विविध शासकीय कार्यालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित विभागाकडून सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोवंश हत्या बंदीमुळे निर्माण झालेल्या भाकड जनावरांच्या देखभाल व चाऱ्यांच्या प्रश्नांबाबत

**(१९) * ११६९७ श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ७६८५ ला दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा लागू झाल्यामुळे भाकड गायीच काय करावे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिल्याने शासनाने भाकड गायींना मोफत चारा पुरविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातत्याचे अवर्षण आणि दुष्काळी परिस्थिती यामुळे शेतीला निरूपयोगी ठरलेल्या जनावरांच्या पालनाचे संकट शेतकऱ्यांवर उद्भवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत मराठवाडयात तीव्र चारा टंचाई भासत असल्याने शासनाने चाऱ्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत व चारा अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रमाची अंमलबजावणीसाठी मराठवाडा विभागासाठी रुपये ११ कोटी २१ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. चारा निर्मिती प्रकल्पाकरीता

मराठवाडयासाठी रुपये ३ कोटी ८७ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. शासनाने मराठवाडयातील बीड, लातूर व उस्मानाबाद या जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात २३ पशुधन छावण्या उघडून पशुधनास छावण्यातील जनावरांना आवश्यक चारा व मोफत औषधोपचाराच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लवासा प्रकल्पासाठी कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आलेली जमीन आदिवासींना परत करण्याबाबत**

**(२०) * ११९७८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, ॲड.अनिल परब, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुळशी (जि.पुणे) येथील लवासा प्रकल्पासाठी कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आलेली आदिवासींची १९१ एकर जमीन त्यांना परत करण्याबाबतचे आदेश उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळशी तालुक्यात लवासातर्फे लेक सिटी प्रकल्प उभारला जात आहे त्यासाठी आदिवासींची जमीन घेतल्याचा आरोप होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आदिवासींच्या जमिनींवर बांधकामाचे कुठलेही नियोजन नसल्याने उक्त आदेशाचा प्रकल्पावर कोणताही परिणाम होणार नाही अशी भूमिका लवासा ने मांडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, आतापर्यंत किती आदिवासींना जमिनी परत करण्यात आल्या आहेत,
(५) असल्यास, आदिवासींच्या जमिनी परत मिळविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) प्रश्नाधीन प्रकल्पासाठी काही आदिवासीची जमीन लवासा कॉपोरेशन लि. यांनी संबंधित आदिवासींकडून खाजगी वाटाघाटीने खरेदी केल्या आहेत.
(३) सदर बाब ही लवासा या खाजगी कंपनीबाबत असल्याने याबाबत शासनाचे अभिप्राय नाहीत.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीन प्रत्यार्पित करण्याचा अधिनियम, १९७४ व नियम, १९७१ प्रमाणे चौकशी पूर्ण करुन उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी यांनी आदेश पारीत केलेले आहेत व एकूण १५ आदिवासी खातेदार यांना जमीनी परत केलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील देवाडा सिमा नाक्यावर ट्रक धारकाकडून होत असलेल्या अवैध वसुलीबाबत**

**(२१) * ११०८६ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या देवाडा सिमा नाक्यावर ट्रक धारकाकडून अवैध वसुली प्रकरणात नागपूर व वर्धा एस.सी.बी. पथकाने दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास धाड टाकून संबंधित अधिकारी व कंत्राटी कर्मचारी यांना अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वसुली करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय,

(२) या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून खटला दाखल करण्याबाबत प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही, तो प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंहगड (जि.पुणे) रोपवेच्या जागेला गावठाणांचा दर्जा देण्याबाबत**

**(२२) * ११५३२ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सिंहगड रोपवेचे काम गावठाणाच्या मंजूरीअभावी रखडले आहे, एक वर्षापासून आतकरवाडी गावठाण मंजूरीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात प्रलंबित आहे. मात्र अद्याप गावठाणास मंजूरी मिळाली नसल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रोपवेच्या जागेला गावठाणाचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२) सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडून अभिप्राय प्राप्त करुन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर शहरातील स्टारबस चालविणाऱ्या वंशनिमय कंपनीने प्रवासी व वाहन कर थकविल्याबाबत**

**(२३) * ११११९७ श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील स्टारबस चालविणाऱ्या वंशनिमयकडे प्रवासी व वाहन कर असे मिळून रुपये ८ कोटी ३३ लाख थकलेले असताना मुदत देऊनही कर भरत नसल्याने अखेर प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) शहरातील १६ धावत्या स्टार बसेसवर दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास कार्यवाही केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारवाईमुळे वाडी व हिंगणा मार्गावरील प्रवाशांना प्रचंड हाल सहन करावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वंशनिमय कंपनीने प्रवाशी व वाहन कर भरुन प्रवाशांचे होणारे हाल थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय,

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आपत्तीप्रवण जिल्ह्यात धोका नियंत्रण कार्यक्रमांतर्गत उपाययोजना राबविण्याबाबत

**(२४) * ११४१९ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औरंगाबाद, पुणे, अमरावती तसेच पश्चिम महाराष्ट्र व कोकणामधील अनेक जिल्हे बहुआपत्तीप्रवण असून येथे भूकंप, पूर, ढगफुटी, भूस्खलन, दुष्काळ, तसेच रासायनिक कंपन्यांमध्ये होणारे अपघात इ. सारख्या आपत्ती धोका असल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा बहुआपत्तीप्रवण जिल्ह्यांत आपत्ती कोसळल्यास कमीत कमी नुकसान व्हावे, त्वरीत उपाययोजना राबविण्यात याव्यात यासाठी तंज्ञांकडून सर्वे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सभांव्य आपत्तीच्या अनुषंगाने प्रभोधनात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातंर्गत यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली आहे. उदा. रबर बोट, मेगा फोन, सर्च लाईट इ. सदर यंत्रसामुग्री चालविण्याचे संबंधितांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व गावस्तरीय समित्याव्दारे शोध व बचाव कार्य पथकांना प्रशिक्षण देण्यात येते. आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्ययावत करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना करण्यात आल्या आहेत. आकाशवणी, एस.टी.बस स्थानक, स्थानिक वाहिन्या याद्वारे आपत्ती दरम्यान काय करावे व काय करु नये याबाबबत प्रबोधन करण्यात येते. औद्योगिक क्षेत्रामध्ये रासायनिक कंपन्यामधील आपत्ती दरम्यान घ्यावयाच्या काळजीबाबत जनजागृती कार्यक्रम घेण्यात येतात.

-----------------

## नागपूर येथील मोटार अपघात दावा न्यायालयातील विविध समस्यांबाबत

**(२५) * ११०६९ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात सद्य:स्थितीत मोटार अपघात दावा न्यायालयांची संख्या किती आहे,

(२) तसेच, सद्य:स्थितीत असलेले मोटार अपघात दावा न्यायालये हे जिल्हा सत्र न्यायालय इमारतीमध्ये ५ व्या, ६ व्या व ७ व्या मजल्यावर कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इतक्या उंच ठिकाणी जाण्यासाठी व्यवस्था नसल्याने ब-याचवेळा अपंग व्यक्ती न्यायालयात उपस्थित राहू शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या न्यायालयांची संख्या वाढवून त्यासाठी नवीन इमारतीमध्ये खालच्या मजल्यावर न्यायालये स्थापन करण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून केली जात आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(६) तसेच, स्वतंत्र जागेचा व इमारतीचा या प्रलंबित प्रश्नासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाची नागपूर शहरात ४ न्यायालये कार्यरत आहेत.

(२) सदर न्यायालये जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारतीमध्ये जून, २०१५ पासून दुसऱ्या मजल्यावर स्थानांतरीत झाले आहेत.

(३) हे खरे नाही, सदर न्यायालय दुसऱ्या मजल्यावर असून इमारतीमध्ये जाणे-येणे करण्यास सहा उद्वाहनांची व्यवस्था आहे.

(४) होय, या संदर्भात नागपूर येथे नवीन मोटार अपघात दावा न्यायाधिकरणे स्थापन करण्यासंदर्भात जनहित याचिका क्र.८२/२०१४ दाखल करण्यात आली होती. सदर जनहित याचिका मा.उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) सदर न्यायालये जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारतीमध्ये जून, २०१५ पासून दुसऱ्या मजल्यावर स्थानांतरीत झाले आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) येथे नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करणेबाबत**

**(२६) * १२५७५ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथे नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री, परिवहन यांचेकडे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव हे जिल्ह्यातील मध्यवर्ती तालुक्याचे ठिकाण असून याठिकाणी केंद्र व राज्य शासनाची बरीच कार्यालये आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खामगांव, शेगांव, नांदुरा, जळगांव, जामोद, संग्रामपूर, सोनाळा या गावांतील नागरीकांना सुध्दा बुलढाणा येथे पासिंग व लायसन्स करीता जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गावांतील नागरीकांची गैरसोय थांबविण्यासाठी खामगांव येथे नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.
(३) उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बुलढाणा यांच्यामार्फत प्रत्येक महिन्यात खामगांव येथे दोन व शेगांव, नांदुरा, जळगांव जामोद येथे प्रत्येकी एक असे शिबीर घेण्यात येतात. या शिबीरांच्या ठिकाणी शिकाऊ अनुज्ञप्ती, नवीन नोंदणी व वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र देण्याचे काम करण्यात येते. या शिबीरांच्या दिवसांव्यतिरिक्त जर वाहन / अनुज्ञप्ती धारकाचे कामकाज असल्यास बुलढाणा येथे जाणे आवश्यक आहे. तसेच वाहन हस्तांतर, भाडे खरेदी करार, परवाना, ना-हरकत प्रमाणपत्र, अनुज्ञप्ती नुतनीकरण व इतर कामाकरिता वाहन / अनुज्ञप्ती धारकास उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा येथे जावे लागते.
(४) राज्यामध्ये नवीन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकष निश्चित करण्यासाठी परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जैतापूर (जि.रत्नागिरी) येथे अणू ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत**

**(२७) * ११८९० अॅड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ८१८३ ला दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विजेची कमतरता विचारात घेऊन केंद्र शासनाच्या माध्यमातून जैतापूर (जि.रत्नागिरी) येथे अणूऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जैतापूर अणूऊर्जा प्रकल्पाचे काम सध्या कोणत्या स्थितीत आहे व प्रकल्पाचे काम केव्हा पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांची शेत जमीन प्रकल्पाखाली जाणार आहे त्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन/भरपाई कशा पध्दतीने करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, प्रकल्पाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पाची सद्य:स्थिती पुढील प्रमाणे आहे.

अ) प्रकल्प स्थळाच्या ३ कि.मी. लांबीच्या संरक्षक भिंतीचे काम पूर्ण झाले आहे.

ब) प्रकल्प स्थळावर प्रकल्पाचे कार्यालय, गुणवत्ता प्रमाणपत्र प्रयोग शाळा यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

क) उच्च दाब/ कमी दाबाच्या वीज पुरवठ्यासाठी व्यवस्था करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

ड) अग्निसुरक्षा व औद्योगिक सुरक्षा विभाग आणि प्रथमोपचार केंद्रासाठी इमारतीचे बांधकाम सुरु आहे.

ई) प्रकल्पस्थळावर रुग्णवाहिका व प्रथमोपचार सेवा सुरु करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करणे ही बाब केंद्र शासनाशी संबंधित आहे.

(३) सदर प्रकल्पासाठी ज्या खातेदारांची जमीन संपादन करण्यात आली, त्यांना भूसंपादन कायद्यानुसार देय भूसंपादन मोबदला व प्रति हेक्टर रुपये २२.५० लाख या दराने वाढीव मोबदला म्हणून सानुग्रह अनुदान या प्रमाणे जमिनीचा मोबदला देण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र शासन व प्रकल्प संस्था (न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.) यांच्यामध्ये पुर्नवसन योजना बाबत झालेल्या करारानुसार प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीस प्रकल्पामध्ये कायमस्वरुपी नोकरी किंवा ५ लाख रुपये लाभ देणेबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच कराराप्रमाणे अन्य लाभ देण्यात येतील.

(४) अनुक्रमांक २ प्रमाणे

(५) व (६) सदर प्रकल्प केंद्र शासनामार्फत उभारण्यात येत आहे.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील मुळशी धरणग्रस्तांना पुनर्वसन कायदा लागू करण्याबाबत

**(२८) * १२६९२ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाटा कंपनीने बांधलेल्या मुळशी धरणाची उंची १ मीटरने वाढविल्याने मुळशी धरण परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची उंची वाढविल्याने ५० हेक्टर पेक्षा जास्त शेत पाण्याखाली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील बाधीत शेतकऱ्यांना शासकीय योजनाचा लाभ होण्यासाठी मुळशी धरणग्रस्तांना पुनर्वसन कायदा लागू करणार आहे काय,

(४) असल्यास, पुनर्वसन कायदा लागू करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. धरणाच्या उंचीमध्ये १ मी.ने वाढ केल्यामुळे १३४.६७ हे. क्षेत्र पाण्याखाली जाणार आहे. तथापि, त्यापैकी केवळ २०.१२ हे.क्षेत्र खाजगी भुधारकांचे असून उर्वरित क्षेत्र टाटा पॉवर कंपनीच्या मालकीचे आहे.

(३) व (४) पुनर्वसन कायदा लागू करण्यासाठीच्या प्रचलीत धोरणाच्या अनुषंगाने तसेच बाधित क्षेत्रापैकी बहुतांश क्षेत्र टाटा पॉवर कंपनीच्या मालकीचे व १९२७ साली संपादीत करण्यात आलेले असल्याने पुनर्वसन कायदा लागू करण्यात आलेला नाही तथापि, मुळ प्रकल्पग्रस्तांच्या खापरपणतुस खास बाब म्हणून "प्रकल्पग्रस्त दाखला" देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सौर कृषीपंप वितरणाची महत्त्वाकांक्षी योजना १०० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(२९) * ११४५३ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सौर कृषीपंप वितरणाची महत्त्वाकांक्षी योजना यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यात लागू करण्यात आली असून त्यासाठी शेतकऱ्यांकडून एकूण खर्चाचा ५ टक्के रक्कम घेण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांकडून ५ टक्के रक्कम न घेता १०० टक्के अनुदानावर सौर कृषीपंप शेतकऱ्यांना देण्यात यावी त्याचबरोबर धडक सिंचनातील विहिरींची खोली वाढवावी अशी मागणी शेतकरी बचाओ आंदोलन समितीतर्फे जिल्हाधिकारी व महावितरणाचे अधिक्षक अभियंता यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने विचारविनिमय केला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) राज्यात सौर कृषि पंप आस्थापित करण्याचे धोरण शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१४/प्र.क्र.२१९/ऊर्जा-७, दिनांक २७ मार्च, २०१५ अन्वये जाहीर करण्यात आले आहे. सदर योजनेनुसार केंद्र शासनाचे अनुदान ३०%, राज्य शासनाचे अनुदान ५%, घ्यावयाचे कर्ज ६०% असून लाभार्थीचा हिस्सा ५% असणार आहे.

(२) अशा प्रकारची मागणी महावितरणाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत

**(३०) * १२६३९ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात पावसाअभावी सुमारे सोळा हजार हेक्टरवरील पेरण्या वाया गेल्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) पुणे जिल्हयातील ७६ गावांची हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आली आहे. बाधित झालेल्या गावातील एकुण क्षेत्र ४८९८९ हेक्टर असून जिरायतीखाली ४६०७६ हेक्टर, बागायतीखाली २२६१ हेक्टर व फळपिकाखाली ६५२ हेक्टर क्षेत्र आहे.

(३) व (४) शासन निर्णय दिनांक २०.१०.२०१५ अन्वये पुणे जिल्हयातील सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी कमी असलेल्या ७६ गावांमध्ये दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहीर करुन त्याअनुषंगाने विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----------------

**राज्यातील वीज उपकरणे व वीज वितरण यंत्रणेत अद्यावत तंत्रज्ञान वापरण्याबाबत**

**(३१) * ११९४२ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीजेच्या धक्क्यामुळे वर्षभरात १५०० जणांना जीव गमवावा लागल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये वीज उपकरणे हाताळण्यातील चुका, वीज वितरण यंत्रणा कोलमडणे, वीजवाहिनी तुटणे आदिंसारख्या दुर्घटनेत मोठ्या प्रमाणात जिवीतहानी झाल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत यंत्रणेतील अनेक दोष सुधारण्यासाठी कोणतेही अद्यावत तंत्रज्ञान सुधारणा झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वीजेच्या धक्क्यापासुन होणाऱ्या दुर्घटना कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही, मुख्य महाव्यवस्थापक, प्रशिक्षण व सुरक्षा कार्यालय एकलहरे, नाशिक यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या वर्षभरात एकूण प्राणांतिक अपघातांची संख्या ७९९ आहे. यात कर्मचाऱ्यांची संख्या ४० व बाहेरील व्यक्तीची संख्या ७५९ इतकी आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) महावितरण कंपनीकडून विद्युत सुरक्षेविषयी ग्राहक व जनतेस जागरुकता निर्माण करण्यासाठी विविध स्तरावर रॅलीचे आयोजन करण्यात येते. प्रशिक्षण व सुरक्षा विभाग नाशिक अंतर्गत कार्यरत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र नाशिक, अमरावती, औरंगाबाद व सांगली व्दारे २०१५-१६ या वर्षात ग्राहकांना सुरक्षाविषयी मार्गदर्शन

करणारे एकूण १०० कार्यक्रम आयोजित करण्याचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे व त्या अनुषंगाने ऑक्टोंबर, २०१५ पर्यंत एकूण ३५ कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत. कर्मचाऱ्यांना होणारे विद्युत अपघात कमी करण्याकरिता महावितरणच्या मंडल कार्यालयाच्या अंतर्गत २५ लघु प्रशिक्षण केंद्रात विद्युत अपघात कमी करण्याकरीता महावितरणच्या मंडल कार्यालयाच्या अंतर्गत २५ लघु प्रशिक्षण केंद्रात विद्युत सुरक्षेविषयी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधने पुरविली जातात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### पनवेल तहसिल कार्यालयाच्या जागेवर प्रशासकीय भवन बांधण्याबाबत

**(३२) * १२२०८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनेवल शहरातील खाजगी जागेत असलेली शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आणण्यासाठी पनवेल तहसिल कार्यालयाच्या जागेवर प्रशासकीय भवन बांधण्याचे काम सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १० वर्षे भाडेतत्वावर असलेल्या पनवेल कामगार आयुक्त कार्यालयाला सदर प्रशासकीय भवनामध्ये सामाविष्ट करुन घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कामगार आयुक्त कार्यालयास जागा मिळवून देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) पनवेल जिल्हा रायगड येथील तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या कामास शासनाने दि.०६/०३/२०१२ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून त्यानुसार सदर इमारतीचे बांधकाम सुरु आहे.
(२) सदर प्रशासकीय भवनाच्या मंजूर बांधकामाच्या आराखड्यात कामगार उपायुक्त, पनवेल यांच्या कार्यालयाचा समावेश नाही.
(३) व (४) कामगार उपायुक्त, पनवेल यांच्या कार्यालयास जागा देण्याची शक्यता पडताळण्यात येत आहे.

-----------------

### सेलू (जि.परभणी) येथील बसस्थानक सुरू करण्याबाबत

**(३३) * १२५१२ श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) येथील बसस्थानकाच्या इमारतीचे काम एक वर्षापूर्वी होवूनही उद्घाटना अभावी बसस्थानक सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानक नागरीकांच्या सोयीसुविधेसाठी सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) सदर बसस्थानकाचे बांधकाम फेब्रुवारी, २०१४ मध्ये पूर्ण झाल्यानंतर माहे डिसेंबर, २०१४ पासून प्रवाशांसाठी बसस्थानकाचा वापर सुरु करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी पाड्यांवरील शाळांसाठी जुन्या आणि भंगारात निघालेल्या एसटी बसेसचा वापर करण्याबाबत

**(३४) * १२२३७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.राजेंद्र जैन, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी पाड्यांमधीलं शाळांवरील एसटीच्या जुन्या आणि भंगार निघालेल्या बसेसचा वापर करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आदिवासी पाड्यांवरील शाळांसाठी किती ठिकाणी एस.टी. बसमध्ये शाळा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळाच्या जुन्या व भंगारात निघालेल्या बसेसचा राज्यातील आदिवासी पाडयांवर शाळा म्हणून वापर करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे. तद्नुषंगाने संबंधित विभागांकडून त्यांचे अभिप्राय /प्रस्ताव मागविण्यात आले असून त्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाकडून प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अल्पसंख्यांक समुहातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सवलत योजनेत करण्यात आलेल्या बदलाबाबत

**(३५) * ११७३४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्यांक समूहातील गरीब गुणवंत विद्यार्थ्यांना व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण घेता यावे यासाठी शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाकडून सन २००८-२००९ पासून एक योजना सुरु करण्यात आली असून पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरचे तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या जैन, पारशी, मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात असून किमान गुणाची अट ५० टक्के आहे, हे खरे आहे काय,

(२) सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षापासून या शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी उत्पन्न मर्यादा अडीच लाखांहून एकदम ६ लाख करण्यात आल्याने या योजनेचा लाभ गतवर्षीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना होणार असला तरीही उत्पन्नाबरोबर गुणवंत्ता हा निकष लावण्यात आल्यामुळे व उत्पन्नाची मर्यादा वाढल्यामुळे जेमतेम साधनांनी अभ्यास केलेल्या गरीब प्रामाणिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना याचा फटका बसणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) राज्यातील अल्पसंख्याकाच्या लोकसंख्येच्या तुलनेत शिष्यवृत्तीसाठी उद्दिष्ट निर्धारित केले जाते मात्र या वर्षासाठी या योजनेंतर्गतचे उद्दिष्ट अद्यापी निश्चित झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) उत्पन्न मर्यादा वाढविल्यामुळे पुन्हा कमालीची स्पर्धा निर्माण होवून आर्थिक दृष्ट्या वंचित असलेल्या सर्वच अल्पसंख्याकांना शिष्यवृत्ती मिळणार नाही त्यामुळे अल्पसंख्याकांना अनुसूचित जाती-जमातींच्या धर्तीवर सरसकट शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे याबाबत रंगनाथ मिश्रांच्या शिफारशीचा शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी आता पुढे आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

पदवी व पदवीका अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड ही त्यांनी माध्यमिक / उच्च माध्यमिक परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादीनुसार केली जाते. तर पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची निवड त्यांनी पदवी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादीनुसार केली जाते. यासाठी किमान ५० % गुणांची अट नाही.

(२) नाही.

विद्यार्थ्यांच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.५ लाखावरुन रुपये ६ लाख करण्यात आली असली तरी, या योजनेच्या उर्वरित सर्व अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्यात आल्या आहेत.

(३) नाही.

दिनांक १४ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये वैद्यकीय व अर्धवैद्यकीय अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तीची संख्या २५०० व वैद्यकीय व अर्धवैद्यकीय अभ्यासक्रम वगळता उर्वरीत तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीची संख्या १५००० तसेच इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या (उदा. कला.वाणिज्य आणि विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम) विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीची संख्या २००० निर्धारीत करण्यात आली आहे.

(४) नाही.

दि.१४ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार उद्दीष्ट निर्धारीत करण्यात आले असले तरीही दरवर्षी उपलब्ध निधीच्या मर्यादेत गुणवत्ता यादीनुसार सदरहू उद्दीष्ठापेक्षा अधिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. आजतागायत अर्ज करणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**काटोल (ता.काटोल, जि.नागपूर) येथील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेची भरपाई मिळण्याबाबत**

**(३६) * १२२९९ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (ता.काटोल, जि.नागपूर) येथील १६०० शेतक-यांनी सन २०१४ च्या खरीप हंगामात पीक विमा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) या तालुक्यातील पीक आणेवारी ४१ टक्के आल्याने सुमारे १२५१ शेतक-यांना विमा कंपनीने लाभार्थी ठरवून या शेतक-यांना पीक विमा योजनेची रक्कम तालुका कृषि अधिकारी यांना दिल्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असे असताना लाभार्थी शेतक-यांना पीक विमा योजनेची भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व या शेतक-यांना पीक विमा योजनेचे पैसे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राष्ट्रीय कृषी विमा योजना खरीप २०१४ मध्ये काटोल तालुक्यातील १५४९ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता.

(२), (३) व (४) काटोल तालुक्यातील १५४९ शेतकऱ्यांनी रुपये ११.०९ लाख विमा हप्ता भरुन पीक विमा योजनेत सहभाग घेतला होता. योजनेच्या निकषानुसार त्यापैकी १४५१ शेतकऱ्यांना रुपये ८३.५८ लाख इतकी नुकसान भरपाई भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली असून ती जून व जुलै, २०१५ मध्ये संबंधित बँकामार्फत लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नगर जिल्ह्यातील बित्तमगड परिसरात कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी कायमस्वरुपी यंत्र बसविण्याबाबत**

**(३७) * १२४४२ डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर जिल्ह्यातील बित्तमगड परिसरात कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी कायमस्वरुपी यंत्र बसविण्याची मागणी या परिसरातील रहिवाश्यांनी केल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) (२) व (३)

कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी कोणतेही यंत्र उपलब्ध नाही. कृत्रिम पावसाचा प्रयोग पूर्णपणे शास्त्रोक्त पध्दतीने केला जाणारा प्रयोग आहे. हा प्रयोग बाष्पयुक्त ढगांची उपलब्धतेवर अवलंबून आहे. त्यामुळे, एखाद्या विशिष्ट परिसरात हा प्रयोग करता येत नाही.

----------------

**पंढरपूर तालुक्यातील (जि.सोलापूर) ऊस नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(३८) * १२७२८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर तालुक्यामध्ये (जि.सोलापूर) पाण्याअभावी सुमारे १२ लाख टन ऊसाचे पीक जळून शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून जळलेल्या पिकांचा पंचनामा करुन शेतकऱ्यांना अनुदान रुपाने आर्थिक मदत दिली गेली आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) खरीप हंगाम २०१५ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात सरासरी पर्जन्यमानापेक्षा कमी पाऊस पडला. त्यामुळे पुरेसे पाणी उपलब्ध न होऊ शकल्याने ऊस पिकाखालील एकूण क्षेत्रापैकी नजर अंदाजानुसार सुमारे १८,००० हेक्टर क्षेत्रावरील ऊसाच्या उत्पादनात प्रथमदर्शनी सुमारे १० ते १५ टक्के घट अपेक्षित आहे. ऊस जळू नये म्हणून सुक्ष्म सिंचनाचा व सेंद्रिय आच्छादनाचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.
(२) सोलापूर जिल्हा हा प्रामुख्याने रब्बी जिल्हा आहे. रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी ३१ डिसेंबर रोजीपर्यंत घोषित करण्यात येते. रब्बी हंगामाची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आल्यास पंढरपूर तालुक्यातील बाधित गावातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा तालुक्यातील (जि.सोलापूर) डाळिंब नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(३९) * १२३२८ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा तालुक्यातील (जि.सोलापूर) शेतकऱ्यांच्या शेतामध्ये माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सुमारे साडेचार हजार हेक्टरवर डाळिंबाचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, या चौकशीत किती नुकसान झाले आहे, त्याप्रमाणे शेतकऱ्यांना कोणते आर्थिक साह्य करण्यात आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे. मंगळवेढा तालुक्यातील ४८२ हेक्टर क्षेत्रावर तेलकट डाग रोगाची ३ ते ४ टक्के तीव्रता आढळून आली.

(२) व (३) फलोत्पादन पिकावरील किड रोग सर्वेक्षण सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) अंतर्गत डाळींब पिकावरील किड रोगांचे सर्वेक्षणाअंती, रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यावर रोगाच्या नियंत्रणाकरीता क्लोरापायरीफॉस ५० टक्के, ३.५ लिटर व कॉपर ऑक्झीक्लोराईड ५० टक्के, ६.७५ किलो या औषधांचा पुरवठा शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित गावात ६ शेतकरी मेळावे, तालुकास्तरावर ८० चर्चासत्रे, १०० भित्तिपत्रके व ३२ रोग निवारण सल्ल्याद्वारे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील साखर कारखान्यांना ऊसापासून थेट इथेनॉल निर्मिती करण्यास परवानगी देण्याबाबत**

**(४०) * ११४८८ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऊसापासून थेट इथेनॉल निर्मिती केल्यास शेतकऱ्यांना ऊसाला टनामध्ये रुपये ३७०० दर देणे शक्य आहे, यासाठी साखर कारखान्यांना ऊसापासून इथेनॉल निर्मिती करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी मागणी एका शेतकरी संघटनेने केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील साखर कारखान्यांना ऊसापासून थेट इथेनॉल निर्मिती करण्यासाठी परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) शासन निर्णय क्र. बीपीए-११०२/सीआर-१०/इएक्ससी-३, दि.१०/०७/२००३ अन्वये मळीप्रमाणे मद्यार्क/ऊसाच्या रसापासून मद्यार्क/जलरहित मद्यार्क निर्मितीचे धोरण आहे. सदर निर्णयानुसार साखर कारखन्यांना दि. १० जुलै, २००३ पासून ऊसाच्या रसापासून मद्यार्क निर्मिती करुन किंवा थेट इथेनॉल निर्मिती करुन किंवा थेट इथेनॉल निर्मिती करण्यासाठी नमूना “आय” अनुज्ञप्तीचे मंजूरीचे शासनाचे धोरण आहे. त्यानुसार विनंती करणाऱ्या घटकांना परवानगी देण्यात आली आहे/देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**अल्पसंख्यांक तरूणांना शिक्षण व स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत**

**(४१) * ११६६८ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक २९९६ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला शासनाने मागील अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने निधी न मिळाल्याने अल्पसंख्यांक तरुणांना शिक्षण व स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत महामंडळाकडे केलेले अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधीअभावी अल्पसंख्यांक तरुण शिक्षणापासून वंचित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अल्पसंख्यांक तरुण शिक्षण व स्वयंरोजगारापासून वंचित राहु नयेत म्हणून शासनाकडून कायमस्वरुपी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) अल्पसंख्याक तरुण शिक्षण व स्वयंरोजगारापासून वंचित राहू नयेत म्हणून शैक्षणिक व विविध कर्ज योजना मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहेत. या महामंडळाचे बळकटीकरण करण्याकरीता महामंडळाचे भागभांडवल रु.५०० कोटी इतके करण्यात आले आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये रु.३२.५० कोटी इतका निधी भागभांडवल स्वरुपात वितरीत करण्यात आला आहे. आतापर्यंत महामंडळास रु.३००.६९१० कोटी इतके भागभांडवल देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात अपघातात जखमी आणि मृत झालेल्या व्यक्तींना नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(४२) * ११३२८ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपघातात जखमी आणि मृत झालेल्या व्यक्तींना नुकसान भरपाई मिळावी म्हणून मोटर ॲक्सिडेंट क्लेम्स ट्रिब्युनलअंतर्गत (एमव्ही ॲक्ट) विशेष लवाद नेमण्यात आला. परंतु वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढत्या वाहनामुळे वाहन अपघाताचे प्रमाण वाढत असल्याने प्रलंबित दावे निकाली काढत असतानाच नविन दावे दाखल होत असल्याने प्रलंबित खटल्यांमध्ये वाढ होत असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील एमव्ही ॲक्टमध्ये दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही, मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाकडे १ जानेवारी, २०१५ अखेर ८७०५१ दावे प्रलंबित होते. त्यामध्ये ३० ऑक्टोबर, २०१५ अखेर २०४४१ दाव्यांचा समावेश झाला असून १ जानेवारी, २०१५ ते ३० ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत २०९९३ दावे निकाली काढण्यात आले आहेत.
(२) शासन अधिसुचना गृह विभाग क्र. एमसीटी-२०१४/२४४/प्र.क्र.५९/परि-५ दिनांक १० सप्टेंबर, २०१५ अन्वये मोटार वाहन कायदा १९८८ मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोठ्या शहरांमध्ये सुरु करण्यात आलेल्या केंद्रीयकृत ग्राहक सेवा केंद्राच्या समस्येबाबत

**(४३) * ११०१३ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मोठ्या शहरांमध्ये विद्युत वितरणाच्या समस्येकरीता राज्य विद्युत वितरण विभागाने शहर स्तरावर केंद्रीयकृत ग्राहक सेवा नंबर वरुन ग्राहकांना विद्युत वितरण समस्येचे निवारण करण्याची योजना सुरु केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या केंद्रीयकृत ग्राहक सेवा नंबर वर आपली समस्या नोंदविताना आपला ग्राहक नंबर व मीटर नंबर सांगून त्यानंतर आपली समस्या स्थानिक स्तरावरील तक्रार निवारण केंद्राकडे दिल्या जाते व त्यानंतर स्थानिक तक्रार निवारण केंद्राकडून वितरणा संबंधीची तक्रार सोडविल्या जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही व्यवस्था सुरु होण्या अगोदर स्थानिक तक्रार निवारण केंद्रावर फक्त आपला खंबा क्रमांक (पोल नंबर) व आपले नाव सांगितले की त्वरीत तक्रार

निवारण केंद्राकडून दखल घेतल्या जात असे व ग्राहकांची विद्युत वितरणा संबंधीची समस्याचे लवकर निवारण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्रीयकृत ग्राहक सेवा नंबर द्वारे सुरु करण्यात आलेल्या योजनेमध्ये फक्त दोनच नंबर असुन ते कित्येकदा लागतच नाही वा लागले तरी कोणीही उचलत नाही ज्याचा ग्राहकांना फार त्रास होतो आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, विद्युत वितरणाच्या समस्येकरीता राज्य विद्युत वितरण विभागाने शहर स्तरावर केंद्रीयकृत ग्राहक सेवा नंबरद्वारे सुरु केलेले सेवा बंद करुन जुन्याच पध्दतीने स्थानिक स्तरावरुन विद्युत वितरण समस्येचे निवारण करण्यात येणार आहे काय,
(६) नसल्यास, पर्यायी उपाययोजना कोणती आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे. महावितरण कंपनीने राज्यस्तरीय मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्र सुरु केले आहे.
(२) मध्यवर्ती ग्राहक तक्रार केंद्रामध्ये नोंदणीकृत मोबाईल नंबर द्वारा तक्रार नोंदविता येते. मोबाईल नंबर नोंदणीकृत नसल्यास ग्राहक क्रमांक किंवा मीटर क्रमांक सांगून तक्रार नोंदविता येते. प्राप्त झालेली तक्रार संबंधीत कर्मचाऱ्याकडे निराकरणासाठी सोपविली जाते.
(३) हे खरे नाही. मध्यवर्ती सेवाकेंद्र सुरु करण्यापूर्वी स्थानिक तक्रार निवारण केंद्रामध्ये वेगवेगळ्या पध्दती अवलंबिल्या जात होत्या.
(४) हे खरे नाही. मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्रात एकूण १५० फोन लाईन्स असून त्या दोन टोल फ्री नंबरशी (१८००२३३३४३५ - BSNL आणि १८००२००३४३५ - RELIANCE) जोडण्यात आलेल्या आहेत.
(५) नाही. शहर स्तरावर तक्रार निवारण केंद्र सुरु करण्याची आवश्यकता नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्ह्यात विद्युत सक्षमीकरण योजनेंतर्गत कृषीपंप वीज जोडणीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(४४) * ११८५९ श्रीमती स्मिता वाघ** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यात विद्युत सक्षमीकरण योजनेंतर्गत कृषीपंप वीज जोडणीसाठी १३० कोटींचा निधी शासन उपलब्ध करून देणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निधी जळगांव जिल्ह्यात वितरणासाठी शासनाने निश्चित आराखडा तयार केला आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी किती कालावधीसाठी उपलब्ध होणार आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यात पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषी ग्राहक संख्येच्या आधारावर रु. १३० कोटीचा निधी मागणी प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून महावितरण कंपनीस प्राप्त झालेला आहे.
(२) कृषीपंप ग्राहकांसाठी अतिरिक्त निधी मागणीबाबत आराखडा तयार करण्याची प्रक्रिया महावितरण कंपनीकडून सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयात घेण्यात येणाऱ्या तलाठी व इतर कर्मचारी वर्गाची परिक्षेच्या गोंधळामुळे पदे रिक्त असल्याबाबत**

**(४५) * ११५४९ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील १५ परिक्षा केंद्रावर जिल्हा निवड समितीने रिक्त असलेल्या १० तलाठी पदासाठी लेखी परीक्षा घेतली असता पुन्हा नव्याने लेखी परिक्षा घेण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सतत परिक्षेत होणारा घोळ, परिक्षार्थीचा होणारा गोंधळ, यामुळे अशा वारंवार परिक्षा घेण्यात येत असल्यामुळे झालेल्या परिक्षेचा निकाल शुन्यच असून पैशाचा अनावर खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सुरळीत व सुनियोजन पध्दतीने परिक्षा घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) औरंगाबाद जिल्हा महसूल आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील १० रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक १४ जून, २०१५ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन पात्र उमेदवाराची दिनांक १३.९.२०१५ रोजी लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. तथापि, या कामी नियुक्त करण्यात आलेल्या अभिकर्ता संस्थेने सदर परिक्षेसाठी सदोष उत्तरपत्रिका पुरविल्यामुळे, तांत्रिक कारणास्तव जिल्हा निवड समितीने सदरची परीक्षा परिषद रद्द केली. सदर रद्द केलेली लेखी परिक्षा महाराष्ट्र राज्य परिक्षा, पुणे यांचेकडे सोपवून दिनांक ११.१०.२०१५ रोजी सुरळीत व सुनियोजन पध्दतीने फेर लेखी परीक्षा घेण्यात आली आहे. तसेच संबंधित

अभिकर्ता संस्थेचा करारनामा रद्द करण्यात आलेला आहे व रद्द करण्यात आलेल्या परीक्षेचा खर्च संबंधित अभिकर्ता संस्थेकडून वसूल करण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील तहसिलदाराचे पद भरण्याबाबत**

**(४६) * १२११२ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील तहसिल कार्यालयाचा कारभार प्रभारी तहसिलदारामार्फत चालत असून तेथे मोठया प्रमाणात तहसिल कार्यालयातील कामे प्रलंबित राहत असल्याने तालुक्यातील नागरीक व विद्यार्थ्यांना नाहक त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर तहसिल कार्यालयाचा कारभार पूर्ण क्षमतेने चालावा म्हणून तहसिलदाराचे पद भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) दिनांक ३०.०५.२०१५ पासून तहसीलदार कुडाळ या पदाचा अतिरिक्त कार्यभार निवासी नायब तहसीलदार कुडाळ यांचेकडे सोपविण्यात आला होता. दिनांक ०७.११.२०१५ पासून तहसीलदार कुडाळ या पदावर नियमित नियुक्ती झालेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कटंगी (ता.गोरेगाव, जि.गोंदिया) येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला (मावेजा) मिळण्याबाबत**

**(४७) * १२५३८ श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कटंगी (ता.गोरेगाव, जि.गोंदिया) येथील मध्यम प्रकल्पासाठी शेतक-यांची जमीन संपादित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतक-यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला (मावेजा) मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी शेतकरी कार्यालयात गेले तर त्यांना अधिकारी उर्मटपणे बोलतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कार्यालयातील अधिकाऱ्यांची चौकशी करुन प्रकल्पग्रस्त शेतक-यांचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला एकूण खातेदार ७५१, रुपये ३,३७,९३,६६१/- एवढी मोबदला रक्कम वाटप करण्यात आली.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) कटंगी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमीनीचा संपूर्ण मोबदला देण्यात आला आहे. सबब चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जमिनीचा मोबदला वाटप करणे शिल्लक नाही.

-----------------

## बोरीवली पश्चिमेतील महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या नॅन्सी बस आगाराची झालेली दुरवस्था

**(४८) * १२०२८ श्री.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली पश्चिमेतील महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे नॅन्सी बस आगार अत्यंत दुरवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांच्या सोयीसाठी सदर आगाराची किती कालावधीत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) बोरीवली नॅन्सी कॉलनी येथील बसस्थानकात प्रवाशांसाठी प्रतिक्षागृहे, हिरकणी कक्ष, संगणकीय आरक्षण तसेच पिण्याचे पाणी इ. सुविधा उपलब्ध असून बसस्थानक आवाराचे डांबरीकरण करण्यात आले आहे.

तसेच बसस्थानक/बसस्थानक आवार, प्रवाशी प्रसाधनगृह व चालक/वाहक विश्रांतीगृहाची स्वच्छता कंत्राटी पध्दतीने निर्मल भारत सेवाभावी संस्था यांचेमार्फत केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्ह्यातील ता.नायगांव व डोनगांव ब्रु व कुंडलवाडी, ता.बिलोली येथे जमिनीची चुकीची फेरफार नोंदणी करणाऱ्या तलाठ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४९) * ११३३१ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.नायगांव (जि.नांदेड) येथील तलाठ्यांच्या चुकीच्या फेरफार नोंदणीमुळे अनेकांचे शेतीचे व्यवहार रोखण्यात आले असून सेतू केंद्रावरील सातबारे व महा ई-सेवा केंद्रावरील सातबा-यात फरक येत असल्याने अनेक शेतकरी खरेदी विक्रीच्या व्यवहारात थांबले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोनगांव ब्रु व कुंडलवाडी, ता.बिलोली (जि.नांदेड) येथील तलाठ्याने गायरान जमिनीमधील चुकीचा पेरा, चुकीचे फेरफार व ७/१२ वरील नोंदी केल्या असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी करुन अशा चूका दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, संबंधित दोषी तलाठ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) ता.नायगांव (खै), जिल्हा नांदेड येथे ऑनलाईन ई-फेरफार आज्ञावलीच्या अंमलबजावणी दरम्यान काही प्रकरणी दुय्यम निबंधक कार्यालय, नायगाव (खै) येथे दस्त नोंदणी करतांना "आय-सरिता" संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ई-लिंकेज प्रणालीमधील गाव न.नं. ७/१२ व पक्षकारांनी महा ई-सेवा केंद्रातून प्राप्त केलेल्या गाव न.नं. ७/१२ उताऱ्यावरील मजकुरात काही प्रमाणात तफावत दिसुन येत असल्यामुळे दस्त नोंदणी करण्यात अडचणी निर्माण झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, दुय्यम निबंधक कार्यालयात "आय-सरिता" प्रणालीद्वारे दस्त नोंदणी करतांना लिंकेज द्वारे उपलब्ध गाव न. नं. ७/१२ व महा ई-सेवा केंद्रातून प्राप्त गाव न. नं. ७/१२ उताऱ्यामध्ये तफावत असल्यास संगणक प्रणालीतील "स्किप लिंकेज" (SKIP LINKAGE) हा पर्याय वापरुन दस्त नोंदणी पुर्ण करण्याबाबत जिल्हा निबंधक कार्यालयाद्वारे सर्व नोंदणी अधिकारी यांना दिनांक ८/१०/२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले असून तद्नंतर दस्त नोंदी बाबत कोणतीही तक्रार नोंदणी अधिकारी यांचेकडे प्राप्त झाली नसल्याचे दिसून आले आहे.

(२) असे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) नायगाव (खै) तालुक्याची संगणकीकृत गाव न. नं. ७/१२ ची अंतिम डाटा सिडी जमाबंदी आयुक्त कार्यालयात दिनांक १/६/२०१५ च्या पत्रान्वये सादर केल्यानंतर तालुक्यात ऑनलाईन ई-फेरफार प्रणाली सुरु होईपर्यंतच्या कालावधीत घेण्यात आलेले फेरफार स्टेट डाटा सेंटरवर अपडेट होऊ शकले नसल्याने व आज्ञावलीतील काही इतर तांत्रीक दोषामुळे दुय्यम निबंधक कार्यालयातील लिंकेज गाव न.नं. ७/१२ मध्ये व महा ई-सेवा केंद्रातून प्राप्त गाव न.नं. ७/१२ उताऱ्यात तफावत दिसुन येत होती. सदरील कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या फेरफाराच्या नोंदी ऑनलाईन पध्दतीने ई-फेरफार आज्ञावलीत नोंदविण्याचे काम तहसिलस्तरावर सुरु आहे. त्याचप्रमाणे ई-फेरफार आज्ञावलीमधील तांत्रीक अडचणीचे निवारण करण्याकामी राष्ट्रीय सुचना केंद्र, पुणे यांच्या मदतीने आवश्यक ती सुधारणात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

वरील पार्श्वभुमीवर संबंधीत तलाठ्यांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**मोहदा (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील दगड खाणीमधून क्षमतेपेक्षा जास्त खडी भरून अवैध वाहतूक होत असल्याबाबत**

**(५०) * १२०९९ श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.राजेंद्र जैन, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहदा (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील दगड खाणीमधून क्षमतेपेक्षा जास्त खडी भरुन अवैध वाहतूक करीत असल्याने रस्त्यामध्ये जागोजागी जीवघेणे खड्डे पडुन मोठ्या प्रमाणात अपघात होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील ग्रामस्थानी तसेच लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, यवतमाळ तसेच तहसिलदार व परिवहन विभाग, वणी यांच्याकडे गेली दोन वर्षापासून वारंवार तक्रारी केल्या असून त्याअनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मोहदा येथे खडी वाहतुकीमुळे रस्ते खराब झाले ही वस्तुस्थिती आहे. मात्र, जीवघेणे खड्डे पडून मोठ्या प्रमाणावर अपघात झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) याबाबत ग्रामस्थांकडून तसेच लोकप्रतिनिधी यांच्याकडून तक्रारी प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, परिवहन विभागाच्या वायुवेग पथकाने वणी परिसरात अतिभार वाहतुकीबाबत केलेल्या तपासणीत, सन २०१४-१५ मध्ये ११० वाहनांवर कारवाई करुन, रु.२१.३४ लाख एवढा दंड वसूल केला आहे. तसेच एप्रिल २०१५ ते सप्टेंबर २०१५ या कालावधीत ३४ वाहनांवर कारवाई करुन रु.६.८२ लाख एवढा दंड वसूल केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील तहसीलदार यांच्या कारभारामुळे नागरिकांना त्रास होत असल्याबाबत

**(५१) * ११६३४ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील तहसीलदार दगडू कुंभार यांच्या कारभारामुळे नागरिकांना नाहक त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयात महसूलात सर्वाधिक उत्पन्न देणारा हवेली तालुका असुन येथील उक्त तहसिलदारामुळे या कार्यालयातून दिले जाणारे महसूली दावे, प्रकरणे प्रलंबित राहत असल्याच्या असंख्य तक्रारी येत आहेत, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) श्री. डी.एस.कुंभार हे तहसीलदार हवेली या पदावर दिनांक ०१.१०.२०१३ पासून कार्यरत असून, माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यत त्यांच्या न्यायालयात एकूण ५५२ महसूली दावे / प्रकरणे दाखल झालेली आहेत. त्यापैकी ३२२ दाव्यावर निर्णय देण्यात आला असून ५७ दावे निर्णयासाठी प्रलंबित आहेत. उर्वरित १७३ दाव्यावर सुनावणी सुरु आहे. श्री. कुंभार यांनी तहसीलदार हवेली या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या कामकाजाविषयी काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. मात्र उपविभागीय अधिकारी, हवेली यांच्यामार्फत त्याविषयी अहवाल घेतला असता सदर तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील दुष्काळी भागात पशुधन वाचविण्यासाठी छावण्या उभारण्याबाबत

**(५२) * १११२८ ॲड.अनिल परब, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन पशुधन वाचविण्यासाठी ५० लाख जनावरांसाठी ३३ छावण्या उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून तालुक्यातील बाजार पेठेच्या ठिकाणी बीड, लातूर व उस्मानाबाद या जिल्हयात जनावरांच्या नऊ छावण्या उभारण्यास शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१५ अखेर किती छावण्या उभारण्यात आल्या आहेत व त्यात किती जनावरांची चाऱ्यांची सोय करण्यात आली आहे,
(३) उपरोक्त छावण्यात द्यावयाच्या जनावरांच्या मालकांना कोणकोणते निकष घालण्यात आले आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) चाऱ्याची टंचाई असलेल्या बीड, लातूर व उस्मानाबाद या तीन जिल्हयात शासन निर्णय दिनांक २०.८.२०१५ अन्वये जनावरांच्या छावण्या सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) नोव्हेंबर, २०१५ अखेर बीड व उस्मानाबाद या दोन जिल्हयात अनुक्रमे १६ व १४ अशा एकूण ३० छावण्या सुरु असून या छावण्यात ३०८५० जनावरे दाखल आहेत.
(३) जनावरांच्या मालकांना जास्तीत जास्त ५ जनावरे दाखल करण्याची मर्यादा असून ८-१० दिवस शेतीकामासाठी बैलांना घरी नेण्यास परवानगी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवीन नाशिक (सिडको, नाशिक) भागातील विद्युत तारांचे पसरलेले जाळे भूमिगत करणेबाबत

**(५३) * १२६८७ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन नाशिक (सिडको, नाशिक) भागात विद्युत तारांचे मोठ्या प्रमाणात जाळे पसरले असून या विद्युत तारा रहिवाशांच्या घरालगत असल्याने नागरिकांच्या जिवीतास असलेला धोका विचारात घेवून या विद्युत तारा भुमिगत करण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन नाशिक, सिडको परिसरातील अनेक भागात विद्युत तारा घराला लागूनच आहेत, गत कालावधीत दहा वर्षीय मुलीचा विद्युत पोलवरील उघड्या विद्युत तारांच्या वीज प्रवाहामुळे मृत्यू झाला होता, या पार्श्वभुमीवर काही भागात विद्युत तारा भुमिगत करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजमितीस सिडको भागातील घराच्या उंची वाढल्याने उघड्या विद्युत तारा थेट गॅलरीला भिडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उघड्या विद्युत तारांमुळे अपघातांच्या संख्येत झालेली वाढ व जनतेच्या जिवीतास असलेला धोका पाहता नवीन नाशिक भागात सर्वच उघड्या विद्युत तारा भुमिगत करणेसंबंधी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नाशिक विभाग-१ मधील भूमिगत विद्युत वाहिन्या टाकण्यासाठी पायाभूत आराखडा योजना-२ (INFRA-II) अंतर्गत ३३ केव्ही, १२ किमी भूमिगत वाहिनी, ११ केव्ही, ६९ किमी भूमिगत वाहिनी तसेच २२२ किमी लघुदाब भूमिगत वाहिनी अशी एकूण रु. १६.९७ कोटीच्या वाहिन्या मंजूर करण्यात आलेल्या आहेत. सदरहु योजनेअंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत.

नविन नाशिक (सिडको, नाशिक) मधील विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यासाठी एकात्मिक ऊर्जा विकास योजना (IPDS) अंतर्गत कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. यासाठीचा एकूण अंदाजित खर्च रक्कम रु. ३६.११ लक्ष प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदरहू योजनेअंतर्गत ११ केव्ही १ किमी, लघुदाब वाहिनी ४ किमी प्रस्तावित आहे.

-----------------

## श्रीवर्धन (जि.रायगड) येथील एस.टी.बसस्थानकाची जीर्ण झालेल्या इमारतीचे नवीन बांधकाम करण्याबाबत

**(५४) * १३४५६ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) येथील एस.टी.बसस्थानकाची इमारत जीर्ण झाली असून संपूर्ण इमारत केव्हाही कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, श्रीवर्धन शहर हे जिल्ह्यातील महत्वाचे ठिकाण असल्याने तसेच या बसस्थानकावरुन राज्यातील अनेक जिल्ह्यात होणारी बस वाहतूक व शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची होणारी गर्दी विचारात घेता नविन बसस्थानकाचे बांधकाम सुरु करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) श्रीवर्धन बसस्थानकाचे काम १९८६-८७ मध्ये करण्यात आले आहे. तसेच, बसस्थानकातील वाहनतळाचे कॉंक्रिटीकरण सन १९९३ साली करण्यात आलेले आहे. सदर बसस्थानकाची दुरुस्ती डागडूजी व रंगरंगोटी वेळोवेळी केली जात असून बसस्थानक इमारत सुस्थितीत आहे. त्यामुळे येथे नवीन बसस्थानकाचे बांधकाम करण्याची बाब सद्या राज्य परिवहन महामंडळाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**दापोली (जि.रत्नागिरी) येथील डॉ.बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत**

**(५५) * १३९७९ श्री.विजय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक १००२९ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठात ३ ते ४ वर्षापासून कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या स्थानिक तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना विद्यापिठात कायम करुन घेण्याबाबत विद्यापिठाकडे सातत्याने इतर संघटनेकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने सदरहू कर्मचाऱ्यांना ठेकेदारांकडून वेतन न अदा करता विद्यापिठाकडून वेतन अदा करुन सदरहू कर्मचाऱ्यांना हजेरी पट सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, काही तृतीय श्रेणी कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती ही डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठामार्फत करुन नंतर त्यांना ठेकेदारांमार्फत दाखवत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त बाबींचा विचार करता सदरहू कर्मचाऱ्यांच्या उज्वल भवितव्याच्या दृष्टीने सदरहू कर्मचाऱ्यांना कायम करुन घेण्याच्या दृष्टीने नव्याने प्रस्ताव सादर करुन तृतीय श्रेणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना विद्यापिठात कायम करुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) सदरहू कर्मचारी हे ठेकेदाराच्या आस्थापनेवरील कर्मचारी असल्याने, सदरहू कर्मचाऱ्यांना विद्यापीठाकडून वेतन अदा करुन हजेरी पट सुरु करण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाडा व विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याबाबत**

**(५६) * १४०४६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा व विदर्भातील दुष्काळी परिस्थिती व कर्जबाजारीपणा या मानसिक तणावामुळे शेतकरी आत्महत्या करीत असून सदर आत्महत्या रोखण्याकरीता शासनाने काही उपाययोजना सुरु केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांनी आत्महत्या केल्यामुळे त्यांचे संपूर्ण कुटूंब उघडयावर येते व त्यामुळे त्यांच्या मुलांचे शिक्षण बंद होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्‌नुषंगाने आत्महत्याग्रस्त मुलांचे संपूर्ण शिक्षण मोफत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) ५० पैशांपेक्षा कमी पैसेवार आलेल्या गावातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याची सवलत देण्यात आली आहे. नांदेड, लातूर, हिंगोली व परभणी या चार जिल्ह्यात खेड्यातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून मोफत पासची योजना राबविण्यात येत आहे. आत्महत्याग्रस्त कुटूंबातील मुलांच्या शिक्षणाकरीता शिक्षण विभाग, जिल्हापरिषद, यांच्या सेस फंड अंतर्ग २५% फि सवलत देण्यात येते तसेच सर्व विद्यार्थ्यांना वर्ग ८ पर्यंत मोफत शिक्षण देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना खरीपाचे अनुदान वाटप होत नसल्याबाबत**

**(५७) * ११११५१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १०२३५ ला दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०१४ मधील पीक नुकसान भरपाईपोटी ३३६ कोटी रुपयांचा पीक विमा मंजूर झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील २५१ कोटी रुपयांचा निधी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला शेतकऱ्यांना पीक विमा नुकसान भरपाईपोटी वितरणासाठी प्राप्त झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेने नियमानुसार १५ दिवसात पीक विमा वाटप करणे बंधनकारक असताना सदर शेतकऱ्यांच्या पैशाची नियमबाह्यरित्या खाजगी बँकेत गुंतवणूक केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बँकेच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पीक विम्याचा पैसा मिळण्यास विलंब झाला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांचे पैसे वाटप न करता ते इतर बँकेत ठेवल्याप्रकरणी चौकशी व पैसे वाटपात झालेल्या विलंबाबद्दल शेतकऱ्यांना दंडनिय व्याज मिळवून देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, ता.माजलगांव, जि.बीड येथील ७३८६ शेतकऱ्यांचे दुष्काळी खरीप पिकांचे सन २०१४ चे अनुदान शेतकऱ्यांना मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, त्यानुसार चौकशी करुन शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) रु.३३६.५८ कोटी रकमेची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली, हे खरे आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचे पत्रानुसार पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम रुपये २५१ कोटी भारतीय कृषी विमा कंपनी मार्फत बँकेस प्राप्त झाली बँकेने सर्व शाखांना दि.०६.०७.२०१५ रोजी रक्कम वर्ग केली. शाखांनी दि.११.७.२०१५ ते दि.२१.११.२०१५ या कालावधीत रक्कम वितरीत केली आहे.

(५) होय.

(६) हे खरे नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अर्जुना प्रकल्पाच्या कालव्यासाठी शासनाचे करोडो रुपयांचे अनुदान घेऊन गैरव्यवहार केल्याबाबत**

**(५८) * ११२९३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अर्जुना प्रकल्पाच्या कालव्यासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमिनीमध्ये जास्तीची झाडे दाखवून शासनाचे करोडो रुपयांच्या अनुदानामध्ये गैरव्यवहार केल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणामध्ये महसूलचा एक वरिष्ठ अधिकारी दलालांच्या मदतीने व्यवहार करीत असल्याने याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषी आढळून येणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतनिधीचे वितरण होण्याबाबत

**(५९) * ११९८३ प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागात माहे फेब्रुवारी, मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती व फळपिकांच्या नुकसानीकरिता शासनाने रुपये ५१ कोटी १९ लाख १४ हजारांचा निधी उपलब्ध केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीपैकी सुमारे ८० टक्के म्हणजे रुपये १० कोटी, २२ लाख, ५० हजारांच्या निधीचे वाटप बाकी आहे व त्यामुळे ९ हजार ६५० शेतकरी मदतीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अमरावती जिल्हयात २०३२ शेतकऱ्यांना रुपये १ कोटी १९ लाख रुपयांचे व अकोला जिल्हयात ९७ शेतकऱ्यांना रुपये १ कोटी २ लाखांचे वाटप बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना उक्त निधीचे त्वरित वितरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व त्यास जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणती कार्यवाही केली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे,

(२) हे खरे नाही. एकूण बाधित शेतकऱ्यांपैकी ९५ % शेतकऱ्यांना मदतीचे वाटप पूर्ण करण्यात आले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे. अमरावती जिल्ह्यातील १३८१ शेतकऱ्यांचे खातेक्रमांक अप्राप्त/ चुकीचे असल्याने सुमारे ८४ लाख इतक्या निधी वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वाटप पूर्ण झाले आहे.

(४) वाटपासाठी अप्राप्त असलेल्या खातेदारांचे खातेक्रमांक व चुकीचे खातेक्रमांक प्राप्त झालेल्या खातेदारांचे खाते क्रमांक प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. खातेक्रमांक प्राप्त होताच अनुदान बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील गावाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(६०) * ११२३५ श्री.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक ७७८० ला दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील गावावर भुस्खलनानंतर डोंगर कोसळून संपूर्ण गाव उध्वस्त झाल्याच्या घटनेला एक वर्षे पुर्ण होऊनही या गावातील ग्रामस्थांचे पुर्नवसन अद्याप झाले नसल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील ग्रामस्थांच्या पुनर्वसनासाठी जागेबाबतचे आक्षेप दूर करुन पुनर्वसन मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) मोजे आमडे येथील सर्व्हे क्र. ४५ ची जमीन पुनर्वसनाकरीता पसंत असल्याचे माळीण पुनर्वसन कमिटीने लेखी पत्र दिले आहे.त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) ग्रामस्थांनी विलंबाने पुनर्वसनाकरीता जागा पसंत असल्याचे लेखी पत्र दिले आहे. पुनर्वसनाचे कामामध्ये जागा निवाड्यापासुन घरे, रस्ते ,गटारी यासारख्या नागरी सुविधामध्ये बाधीत ग्रामस्थांना विश्वासात घेवून प्रत्येक बाबीमध्ये त्यांच्या सुचना विचारात घेवून कार्यवाही सुरू आहे. ग्रामस्थांना विश्वासात घेवून पुनर्वसनाची कार्यवाही सुरू असल्याने सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

-----------------

**विदर्भातील उद्योगांना कमी दरात वीज उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(६१) * ११५८४ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात कमी दरात उद्योगांना वीज देण्याबाबत राज्य शासन धोरण आखत असल्याचे मा.उद्योग मंत्री यांनी जाहिर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, विदर्भातील उद्योगांना कधीपासून सवलत देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विदर्भ व मराठवाडा विभागातील उद्योगांना पुरविल्या जाणाऱ्या विजेच्या दराचे सुसूत्रीकरण व तदअनुषंगिक बाबींवर अभ्यास करण्यासाठी दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कृत्रिम पावसाचा प्रयोग अयशस्वी झाल्याबाबत

**(६२) * १२१४२ श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दुष्काळावर मात करण्यासाठी राज्यात केलेला कृत्रिम पावसाचा प्रयोग यशस्वी झाला नसून ता.येवला, जि.नाशिक येथे कृत्रिम पाऊस पाडण्यात आला परंतू बाष्पयुक्त ढगाअभावी सदरहू प्रयोग देखील अयशस्वी झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ६५ प्रयत्नात कृत्रिम पाऊस पाडण्याचे प्रयोग करण्यात येत असुन त्यावर रूपये २७ कोटी खर्च करून २० टक्के सुध्दा पाऊस पडत नसल्याने त्याकरिता करण्यात येणारा खर्च वाया आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृत्रिम पावसाचा प्रयोग अयशस्वी होण्याची कारणे काय आहेत व त्यावर किती खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) सन २०१५ च्या मान्सून कालावधीत राज्यात प्रथमच पूर्णपणे शास्त्रोक्त पध्दतीने कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यात आला असून, प्रयोग अयशस्वी झालेला नाही. या प्रयोगासाठी रुपये २७.१५ कोटी एवढा खर्च झालेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर येथील दुरवस्थेत असलेल्या बसस्थानकाची दुरुस्ती करण्याबाबत

**(६३) * ११३८५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर येथील बसस्थानकात पावसामुळे खड्डे पडले असून चिखल निर्माण झाला आहे, त्यामुळे बसस्थानकात प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे आक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगाराची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) पंढरपूर येथील बसस्थानकात पावसामुळे निर्माण झालेल्या खड्ड्यावर तात्कालीन उपाय म्हणून खडी व स्टोन ग्रीटच्या सहाय्याने मोठे खड्डे भरण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच बसस्थानकाच्या वाहनतळाचे काँक्रिटीकरण करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसंत गवई समितीचा अहवाल जाहिर करुन त्याची अमंलबजावणी करण्याबाबत

**(६४) * ११४७४ श्री.शरद रणपिसे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महार वतनी जमिनी पुन्हा मुळ वतनदारांना देण्याबाबत अभ्यास करण्यासाठी शासनाने सन १९८३ मध्ये स्थापन केलेल्या जे.डी.पाटील समितीने आपला अंतिम अहवाल शासनाला सन १९८९ मध्ये सादर केल्यानंतर या अहवालातील शासनाने दिनांक ९ सप्टेंबर, १९८९ रोजी वा त्यासुमारास नेमलेल्या उच्चाधिक्कार समितीने आपला अहवाल दिनांक ६ जुलै, १९९१ रोजी दिल्यानंतर अनुसूचित जातीच्या (नवबौध्द) व्यक्तींनी धारण केलेल्या जमिनीचे हस्तांतरण होवू नये किंवा अशी हस्तांतरणे रद्द करुन मूळ वतनदारांना देण्याची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबतचा अभ्यास करण्यासाठी सेवानिवृत्त जिल्हाधिकारी वसंत गवई यांच्या अध्यक्षतेखाली सन २००८ मध्ये नेमलेल्या ५ सदस्यीय समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसंत गवई यांच्या अध्यक्षतेखाली नेमेलेल्या ५ सदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही व त्या अहवालावर कोणतीही कार्यवाही न होता तसाच पडून असल्यामुळे राज्यातील अंदाजे ७ लाख हेक्टर महार वतने जमिनीचा प्रश्न प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) वसंत गवई समितीने सादर केलेल्या अहवालानुसार विनाविलंब निर्णय घेवून राज्यातील सुमारे ७ लाख हेक्टर महार वतनी जमिनी निकालात काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) वसंत गवई समितीने सादर केलेल्या अहवालावर निर्णय घेण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) महार वतन जमिनीचे हस्तांतरण होऊ नये व अशा जमिनीचे पूर्वीच हस्तांतर झाले असल्यास अशा जमिनी मुळ वतनदारांना पुन:स्थापित करण्याची आवश्यकता तपासणे याबाबतचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी शासनाने श्री. व. ल.गवई, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४.११.२००८ च्या शासन निर्णयान्वये समिती नियुक्त केली होती.

सदर समितीने शिफारशीसह अहवाल दिनांक ५.८.२०१४ रोजी शासनास सादर केला आहे. समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.

-----------------

**मौजे परहूरपाडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील गुरचरण जमिनीच्या विक्रीबाबत**

**(६५) * ११७२५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे परहूरपाडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील गुरचरण जमिनीची सुमारे महिनाभरापूर्वी जिल्ह्याबाहेरील व्यक्तीस विक्री करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमिनीची विक्री करण्यापूर्वी पंच व ग्रामस्थांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेतली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहाय्यक धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेण्यात आली नसल्यास कोणत्या नियमाने जमिनीची विक्री करण्यात आली आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी दोषी व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही,

अलिबाग तालुक्यातील मौजे परहुरपाडा ता.अलिबाग येथील सरकारी गुरचरण जमिनीची विक्री झाल्याबाबत अधिकार अभिलेखात नोंदी नाहीत.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्याबाबत**

**(६६) * ११२६४ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वक्फ बोर्डाची ९७ हजार एकर जमीन असून त्यापैकी ७० हजार एकरवर अतिक्रमणे झाली आहेत, या सर्व जमिनी ताब्यात घेतल्या जातील असे मा.महसूल व अल्पसंख्याक कल्याण मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जाहिर केले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिलायन्स इण्डस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांचे ॲन्टिलिया हे उत्तुंग २७ मजली निवासस्थान वक्फ बोर्डाच्या जमिनीवर उभी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वक्फ बोर्डाच्या जमिनीपैंकी किती एकर जमिनीवर खाजगी व शासकीय संस्थांनी बेकायदेशीररित्या अतिक्रमणे केल्याचे निदर्शनास आले आहे,

(४) असल्यास, वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील अतिक्रमणे हटवून या जमिनी सरकार जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे. राज्यात वक्फ मंडळाच्या अधिपत्याखाली सुमारे ९७ हजार एकर इतकी जमीन असून त्यापैकी अंदाजे ७०% जमिनीवर अतिक्रमणे झालेली आहेत.

(२) होय.

(३) वक्फ मंडळाची किती हेक्टर जमीन खाजगी व्यक्ती व संस्थाकडे आहे याबद्दल कोणतेही सर्वेक्षण झालेले नाही. अतिक्रमणे अस्तित्वात असलेल्या प्रकरणांमध्ये वक्फ मंडळाकडून वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५४ मधील तरतूंदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. सद्य: स्थितीत अशा एकूण ४२५ प्रकरणांमध्ये वक्फ मंडळाकडून कलम ५४ ची कार्यवाही सुरु आहे. यापैकी ३२१ प्रकरणे ही खाजगी व्यक्तींनी केलेल्या अतिक्रमणाशी संबंधित आहेत व व उर्वरित १०४ प्रकरणांमध्ये शासकीय व निमशासकीय संस्थांच्या ताब्यात वक्फ मालमत्ता आहे.

(४) वक्फ मालमत्तेशी संबंधित ज्या प्रकरणांमध्ये अतिक्रमणे झालेली आहेत अशा सर्व प्रकरणांमधील संबंधित वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहेत

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सागरी विद्यापीठाचे उपकेंद्र दापोली ऐवजी रत्नागिरीतील जयगड येथे स्थापन करण्याबाबत**

**(६७) * १२४८३ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरी विद्यापीठाचे उपकेंद्र दापोली ऐवजी रत्नागिरी येथील जयगड येथे स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपकेंद्राच्या स्थापनेसाठी केंद्र शासनाकडून ५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उपकेंद्राच्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, केव्हा निर्णय घेतला तसेच निर्णय घेतला नसल्यास केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे, रत्नागिरी येथे मत्स्यविज्ञान व सागरी विद्यापीठ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) नाही.

(३) व (४) मत्स्यविज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मा.मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समितीच्या बैठकीमध्ये सर्व संबंधीत विभागांनी अभिप्राय देण्याबाबतचे निर्देश दिले असून, त्यानुसार सर्व संबंधीत विभागांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. सदर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या औरंगाबाद विभागात अनुकंपा तत्वावर कर्मचाऱ्यांची केलेली भरती**

**(६८) * १२०४३ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या औरंगाबाद विभागात अनुकंपा तत्वावर सन १९९६ ते २००५ या नऊ वर्षाच्या काळात चुकीच्या पध्दतीने कर्मचाऱ्यांची भरती झाल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणात दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या औरंगाबाद विभागामध्ये सन १९९६ ते २००५ या कालावधीत अनुकंपा तत्वावर करण्यात आलेल्या उमेदवारांच्या भरतीमध्ये मृत कर्मचाऱ्याशी कोणत्याही प्रकारचा नाते संबंध नसतानाही काही जणांची बनावट नावाने नोकरी मिळविल्याची प्रकरणे निदर्शनास आली, सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर केलेल्या चौकशीत एकूण ८ उमेदवारांस निलंबित करण्यात येवून त्यांचेवर पुढील प्रमादीय कारवाई राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

तसेच सदर अनुकंपा प्रकरणात जबाबदार असलेल्यांपैकी नऊ कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून दोन कर्मचाऱ्यांचे निधन झाले आहे. तर उर्वरित चार अधिकारी व एक कर्मचारी यांचेविरुध्द राज्य परिवहन महामंडळाच्या नियमाप्रमाणे त्यांच्या स्तरावर कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड येथून पुणे व मुंबई करीता अतिजलद शिवनेरी बस सुरु करणेबाबत

**(६९) * ११८३५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ७४९५ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी वाहतूकदारांशी स्पर्धा करत प्रवाशांसाठी राज्य परिवहन महामंडळाने आता शिवेनरी श्रेणीतील तब्बल ५०० गाड्या भाडे तत्वावर घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड येथून पुणे आणि मुंबई करीता दोन थांबे बसगाड्या सुरु करणे तसेच शिवनेरी बस सुरु करण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड स्थानकातून लांब पल्ल्याच्या बसगाड्या सुरु करणेबाबत चलनीय पडताळणी करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, खाजगी प्रवासी वाहतुकीला आळा बसण्यासाठी बीड स्थानकातून पुणे, मुंबई येथे दोन थांबे आणि शिवनेरी बस सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, अवैध प्रवासी वाहतूक बंद करण्यासाठी यशवंती ही मिनी बस जिल्हयातील सर्वाधिक रहदारीच्या रस्त्यांवर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) बीड बसस्थानकातून १८.०० वा. बीड-मुंबई व १९.०० वा. ची माजलगांव-बीड-मुंबई या लांब पल्ल्याच्या बसेस सुरु आहेत. तसेच पुण्याकरिता बसेस सुरु आहेत.
(५) अवैध प्रवासी वाहतूकीला आळा घालण्यासाठी पोलीस अधिक्षक, बीड व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आला असून त्याबाबत राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच सर्वाधिक रहदारीच्या रस्त्यावर साध्या बसेस बीड विभागामार्फत चालविण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडगावशेरी (जि.पुणे) तालुक्यातील खराडी भागातील जय भवानीनगर परिसरात सतत वीज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत

**(७०) * १३४६१ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगावशेरी (जि.पुणे) तालुक्यातील खराडी भागातील जय भवानीनगर परिसरात सतत वीज पुरवठा खंडीत होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच खंडीत वीज पुरवठयाबाबत येथील नागरीकांनी सातत्याने केलेल्या तक्रारीकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जयभवानी परिसरातील वीज पुरवठा नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) व (४) होय. या प्रकरणी महावितरण कंपनीकडून सदर भागात तात्काळ पहाणी करुन उच्च दाब विद्युत वाहिनी, विद्युत रोहित्र फिडर पीलर व लघुदाब विद्युत वाहिनीच्या देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेऊन विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला. सद्य:स्थितीत सदर भागातील नागरिकांच्या वीज पुरवठयाबाबत तक्रारींचे महावितरण कंपनीकडून पूर्णपणे निवारण करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---------------

**अवैध वाळू उपशामुळे रेल्वे पुलास निर्माण झालेला धोका**

**(७१) * ११७७५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ७८९७ ला दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड जिल्हा परभणी येथील गोदावरी नदी पात्रात अवैध व नियमबाह्य रित्या झालेल्या प्रचंड वाळू उत्खननामुळे येथील रेल्वे पुलास निर्माण झालेला धोका व इतर गैरप्रकारांची चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपजिल्हाधिकारी श्री.शिंदे यांना चौकशी करण्याबाबतचे आदेश सन २०१४-१५ च्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजिल्हाधिकारी श्री.शिंदे यांनी या गैरप्रकाराची चौकशी करुन सादर केलेल्या अहवालावरुन जिल्हाधिकारी, परभणी यांनी माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्तांकडे दोषारोपपत्र सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अवैध वाळू उपश्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, कंत्राटदार व इतर यंत्रणांची चौकशी करुन त्यांना निलंबीत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाचे झालेले नुकसान वसुल करण्याबाबत वरील सर्व दोषींवर कोणती जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी संबंधित तहसिलदार व मंडळ अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून संबंधित ४ तलाठी यांना निलंबित करुन विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहेत.

तसेच सदर ठिकाणी रेतीचे अवैध उत्खनन करणाऱ्या ५ व्यक्तींविरुध्द व ३ ट्रॅक्टर वाहनचालक व वाहन मालकांविरुध्द पोलीसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भ आणि मराठवाडा विभागातील वीज वितरण, कृषीपंप इ.बाबत येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी समिती स्थापन करणेबाबत**

**(७२) * ११९७६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ आणि मराठवाडा विभागातील वीज वितरण, कृषीपंप, वीजेचे दर आणि वीज वाहनावर होणारा खर्च, तसेच उद्योग उभारणी करतांना येणाऱ्या अडचणींवर मात करण्याकरिता विभागीय आयुक्त अनुपकुमार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीला माहे नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत व त्यावर कोणता निर्णय शासनाने घेतला आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) समितीचा अहवाल समिती गठीत करण्यासंदर्भातील शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३ महिन्यात अपेक्षित आहे. समितीकडून अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हा परिषद कृषी विभागांतर्गत शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेल्या लोखंडी बंड्या ह्या कमी वजनाच्या व निकृष्ठ दर्जाच्या असल्याबाबत**

**(७३) * १११०३ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद कृषी विभागांतर्गत शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेल्या लोखंडी बंड्या ह्या कमी वजनाच्या व निकृष्ठ दर्जाच्या वाटप करण्यात आल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय, त्यावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्ह्यातील राजुरा, ब्रम्हपूरी, सावली, मुल, शिंदेवाही व जिवती या तालुक्यामध्ये केलेल्या प्राथमिक चौकशीत नमुना बैलगाड्यांचे वजन २४० किलो ऐवजी १९५ किलो ते २६० किलो पर्यंत असल्याचे आढळून आले.

(२) गुणवत्तापूर्ण औजारे पुरविण्याची जबाबदारी पूर्णत: संबंधित पुरवठा संस्थेची असल्याने, प्रस्तूत प्रकरणी, महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ मर्यादित, चंद्रपूर या शासननियुक्त पुरवठादार संस्थेकडून खुलासा मागविला असून, मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कारवाई करण्याबाबत कळविले आहे.

त्याचप्रमाणे पुरवठादार संस्थेची, पुरवठा पश्चात तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अदा करावयाची देयके थांबविण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्ह्यातील महावितरण कंपनीने गैरव्यवहार केल्याबाबत**

**(७४) * ११२०० श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील महावितरण कंपनीने उद्योगांना त्यांची ग्राहक श्रेणी बदलवून देताना नियमांचे उल्लघंन केले असून त्यामुळे कंपनीला कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरप्रकाराबाबत वीज नियामक आयोगाने महावितरण कंपनीला १८७ कोटी रुपयांचा दंड ठोठावला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) असल्यास, भविष्यात असे प्रकार होऊ नये म्हणून कोणती दक्षता घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीज दर निर्णयात १८७ कोटीचा महसूल कमी दिला ही बाब पुर्नविचार याचिकेव्दारे आयोगाकडे सध्या प्रलंबित आहे. मात्र यासंबंधात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरण कंपनीस दंड ठोठावला हे खरे नाही. सदर प्रकरण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मोठया जिल्हयाचे व तालुक्याचे विभाजन करुन नवीन जिल्हयांची व तालुक्यांची निर्मिती करण्याबाबत**

**(७५) * ११४१७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, ॲड.अनिल परब, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, डॉ.अपूर्व हिरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसुल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रशासकीय सोयीसाठी व नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी नवीन २२ जिल्हे आणि ४९ तालुक्यांच्या निर्मितीबाबत राज्य शासनाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालानुसार कोणते नवीन जिल्हे व तालुके निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापही या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला नसल्यास, किती कालावधीत समितीचा अहवाल प्राप्त होण्याची अपेक्षा आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, सध्या अस्तित्वात असलेले जिल्हे तसेच तालुक्याची ठिकाणे भौगोलिकदृष्ट्या गैरसोयीची ठरलेली असल्याने आणि अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली नाशिक जिल्हयाचे विभाजन करून मालेगाव तसेच, बारामती जिल्हा निर्मितीची मागणी विचारात घेता नवीन जिल्हा निर्मिती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली शा.नि.क्र.प्राफेब-२०१४/प्र.क्र.८७/ठाणेम-१० दि.२४/०६/२०१४ अन्वये समिती गठित करण्यात आलेली आहे. तत्पूर्वी तालुका निर्मिती/विभाजनाचे निकष निश्चित करणेबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली शा.नि.क्र.प्राफेब-२०११/प्र.क्र.९६/म-१०, दि.१५/११/२०११ अन्वये एक अन्य समिती गठित करण्यात आली होती.
(२) व (३) तालुका निर्मिती/विभाजनाबाबत निकष सुचविणाऱ्या समितीचा अहवाल प्राप्त झालेला असुन तो शासनाच्या विचाराधिन आहे.

जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्यासंदर्भात प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीस अहवाल सादर करण्यासाठी दि.०८/०९/२०१५ च्या शासन निर्णयान्वये दि.३१/१२/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(४) मालेगांव जिल्हा निर्मितीची मागणी शासनास प्राप्त झाली आहे. परंतू बारामती जिल्हा निर्मितीची मागणी शासनास प्राप्त झाली नाही. जिल्हा विभाजनाबाबत निकष सुचविणाऱ्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर निश्चित केल्या जाणाऱ्या निकषानुसार मालेगांवसह अन्य जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचनेबाबत उचित निर्णय घेण्याची तजवीज ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आंतरवासिय भत्ता वाढवून देण्याबाबत

**(७६) * १४०१६ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न ६ महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये २८५०/- इतका आंतरवासिय भत्ता दिल्या जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भत्ता राज्यातील समकक्ष विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या भत्त्याप्रमाणे वाढवून देण्याच्या मागणीकरिता महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक विद्यार्थी संघटनेने दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ पासून महाविद्यालय बंद आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर राज्यातील समकक्ष विद्यार्थ्यांना दरमहा १० ते ४० हजार रुपयांपर्यंत आंतरवासिय भत्ता दिल्या जातो या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील पशुवैद्यक विद्यार्थ्यांना इतका अत्यल्प भत्ता दिल्या जात असल्याने तो वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे. सद्यस्थितीत विद्यापीठ महसूलातून रुपये २,६००/- व भारतीय कृषी अनुसंधान परिषदेतर्फे रुपये ४००/- असे एकूण रुपये ३,०००/- आंतरवासिय निर्वाह भत्ता देण्यात येतो.

(२) हे खरे आहे. दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ पासून अहिंसक स्वरुपाच्या संपावर जात असल्याचे विद्यार्थी संघटनेने पत्र सादर केले होते. विद्यार्थ्यांनी हा संप दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी मागे घेतल्याचे विद्यापीठाने कळविले आहे.

(३) आंतरवासिय निर्वाह भत्ता वाढवून देणेबाबतच्या प्रस्तावाची छाननी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगांव (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना वीज जोडणी देणेबाबत**

**(७७) * १२५७० श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०६१ ला दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापासून नवीन कृषी पंपांना वीज जोडणी मिळण्याबाबत अर्ज व पैसे भरुन सुध्दा महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्या. खामगांव यांनी नवीन जोडण्या दिल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना वीज जोडण्या न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना कृषीपंपाची जोडणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे. सन २०१२-१३ मध्ये २३१३ कृषिपंपाना, २०१३-१४ मध्ये २३५७ कृषीपंपाना व २०१४-१५ मध्ये १३९४ व ऑक्टोबर २०१५ अखेर ११९० कृषीपंपाना विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) खामगांव विभागामध्ये माहे ऑक्टोबर, २०१५ अखेर पैसे भरणा केलेल्या कृषीपंप ग्राहकांची संख्या ४७९५ एवढी आहे, सदर कामे जेष्टता यादीनुसार वेगवेगळ्या कंत्राटदारानुसार सुरु आहे. तसेच, महावितरण कंपनीतर्फे इन्फ्रा-२ अंतर्गत २५७ कृषीपंप ग्राहकांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) शेतकऱ्यांना कृषीपंप जोडणी तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने इन्फ्रा-२ योजने अंतर्गत कामे प्रगतीपथावर आहे. तसेच विदर्भ व मराठवाडा कृषीपंप ऊर्जीकरणाकरीता खामगांव विभागामध्ये विशेष कृषीपंप पॅकेज अंतर्गत विविध कंत्राटदारांना एकूण रुपये ४०.५ कोटी रक्कमेची निविदा काढण्यात आल्या असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मिरजे (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील चुकीची फेरफार खरेदी केलेल्या क्षेत्राची दुरूस्ती करण्याबाबत

**(७८) * १३८३८ ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मिरजे (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील तलाठी यांच्या हस्तदोषी लेखन प्रमाणातील तांत्रिक चुकीमुळे फेरफार क्र.३३६ व अन्य फेरफारावर खरेदी केलेले क्षेत्र नोंद करावयाचे राहून गेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उपविभागीय अधिकारी, वाई यांनी महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५/२५८ प्रमाणे निर्णय घेऊन क्षेत्र रेकॉर्डवर घेण्याचे माहे नोव्हेंबर, २०१२ मध्ये वा त्यासुमारास तहसिलदार, खंडाळा यांना निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांनी माहे नोव्हेंबर, २०१२ मध्ये सदरहू मिळकत ७/१२ मध्ये येण्याबाबत क्षेत्राचा मेळा घेऊन दुरुस्तीकरीता पुन्हा अर्ज सादर केलेले असूनही सदरहू मिळकती त्या शेतकऱ्यांच्या नावे झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे मिरजे ता.खंडाळा जि.सातारा येथील जमीन गट नं. ७६३ (जुना स.नं. १११/१ व १११/२ क्षेत्र ७ हे. ४८.४ आर) हि मिळकत श्री पांडु केसू चव्हाण याचे मालकांची होती. त्यांच्या कडून श्री नारायण बाळा चव्हाण यांनी दि. २८/३/१९५७ च्या नोंदणीकृत दस्ताने २०.५ आर एवढे क्षेत्र खरेदी केले. मात्र या व्यवहाराची नोंद फेरफार क्रमांक ३३६ दि. ०५/०३/१९६५ अन्वये करतांना गावकामगार तलाठी यांनी खरेदी खताचे क्षेत्र त्यात नमुद केले नाही.

या संदर्भात यशवंत नामदेव जाधव व इतर ६ यांनी उपविभागीय अधिकारी वाई, यांचेकडे केलेल्या आरटीएस/फेरतपासणी अर्ज/५६/२०११ च्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी वाई यांनी सदर अर्ज अंशत: मान्य करुन फेरफार क्र. ३३६ मधिल दि. ०५/०३/१९६५ चा आदेश रद्द करण्याचा निर्णय दिला आणि सर्वसंबंधितांना नोटीस देऊन फेरचौकशी करुन निर्णय घेण्याचे आदेशित केले.

त्याअनुषंगाने सदर प्रकरणी तहसिलदार खंडाळा यांनी सद्य:स्थितीत दोन्ही पक्षकारांचे लेखी म्हणणे दाखल करुन घेतले असून सदर प्रकरण अंतिम निर्णयासाठी राखून ठेवणेत आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पांढरकवडा, (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील केळापूर मार्गावरील टोलनाक्याजवळ मुक्या जनावरांची अवैध वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(७९) * ११४५० श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील केळापूर मार्गावरील टोलनाक्याजवळ पोलीसांनी एका वाहनामधील १ लाख ६० हजारांचे वाहन असा एकूण चार लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुक्या जनावरांची निदर्यपणे अवैध वाहतूक करणाऱ्या संबधितावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) पांढरकवडा येथील केळापूर मार्गावरील टोल नाक्याजवळ पोलीसांनी रु.१,६०,०००/- ची जनावरे व पिकअप वाहन किंमत रु.२,४०,०००/- असा एकूण रु.४,००,०००/- चा माल जप्त केला आहे.

(२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ यांनी त्यांचे वायुवेग पथक व महसूल सुरक्षा पथक यांना मुक्या जनावरांची निर्दयपणे अवैध वाहतूक करणा-या वाहनांची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. माहे सप्टेंबर २०१५ मध्ये यवतमाळ तपासणी पथकाने एकूण ३ वाहने तपासली असून त्यापैकी १ दोषी वाहनावर कारवाई केली असून रु.२६,०००/- इतका दंड वसूल केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**पुण्यातील सिंहगड रोडवरील पानमळावस्तीतील खांबावरील वीज प्रवाह घरात शिरुन बालिकेचा मृत्यू झाल्याबाबत**

**(८०) * १३३२८ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड रोडवरील पानमळा वस्तीत खांबावरील वीज प्रवाह घरात शिरुन सदर प्रवाहामुळे एका बालिकेचा मृत्यू झाला तर ५ जण जखमी झाल्याची घटना दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मृत बालिकेच्या कुटूंबियांना व जखमींना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या महावितरणाच्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) विद्युत निरीक्षक, पुणे यांनी चौकशी केली आहे.

(३) दिनांक ०८.०९.२०१५ रोजी संध्याकाळी सुमारे ५.४५ च्या दरम्याने पानमळा, दत्तवाडी, पुणे येथील घरासाठी दिलेली सर्व्हीस वायर जीर्ण झाल्यामुळे तिचे इन्सुलेशन निघून आतील वाहक उघडा झाला होता व त्या विद्युत भारीत वाहकाचा संपर्क घरावरील लोखंडी पाईपशी येऊन सदर लोखंडी पाईप व त्यास जोडलेली लोखंडी फ्रेम विद्युत भारीत झाली. घराच्या पत्र्याला आधारासाठी वापरलेल्या लोखंडी पाईपला कु. अव्दीता चंद्रकांत वाघमारे हिचा संपर्क आल्याने तिला वीजेचा धक्का बसला व ती मृत झाली व इतर ५ रहिवाश्यांना वीजेच्या सौम्य धक्का जाणवला. परंतु कोणीही जखमी झाले नाही. सदर मृत बालिकेच्या कुटुंबियांना तातडीची मदत म्हणून रु.२०,००० महावितरण कंपनीकडून दिनांक १८.०९.२०१५ रोजी देण्यात आली आहे. उर्वरित नुकसान भरपाईची रक्कम मयताच्या वारसांनी कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर महावितरण कंपनीकडून देण्यात येईल.

(४) विद्युत निरीक्षक, पुणे यांचेकडून महावितरण कंपनीस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई-विरार महापालिकेच्या क्षेत्रात वीज पुरवठा नियमित खंडीत होत असल्याबाबत**

**(८१) * १२२५६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महापालिकेच्या क्षेत्रात वीज पुरवठा नियमित खंडीत होण्याचे प्रकार घडत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वसई-विरार शहरात वीज पुरवठा खंडीत होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) होय, महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिनांक २६.०८.२०१५ रोजी वसई मंडळ येथे आढावा बैठक घेतली व विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबतच्या सूचना दिल्या.

(३) २२ केव्ही जुचंद्र स्विचिंग स्टेशनचे नियंत्रण कक्ष दुसऱ्या जागेमध्ये स्थलांतर करण्याचा प्रस्ताव मंजुर करुन घेण्यासाठी प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे. २२/२२ केव्ही नालासोपारा स्विचिंग स्टेशन उभारण्याचे काम आर.ए.पी.डी.आर.पी. या योजने अंतर्गत प्रगतीपथावर आहे. वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रामध्ये U & M योजना, तसेच RAPDRP व एकात्मिक ऊर्जा विकास कार्यक्रम (भाग -१) IPDS या योजनांच्या अंतर्गत विविध कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुटीबोरी (जि.नागपूर) येथील अवैध दारूचे धंदे बंद करण्याबाबत**

**(८२) * १२३०५ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुटीबोरी (जि.नागपूर) येथील पंचतारांकित एमआयडीसी जवळ अवैध दारुचे धंदे सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी होलीक्रास कॉनव्हेंट व छत्रपती शिवाजी विद्यालय या शैक्षणिक संस्था असून त्यांच्या १०० मीटर अंतरावर अवैध दारुचे धंदे सुरु असल्यामुळे त्याचा विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, अवैध दारुचे धंदे बंद करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) नाही.

(३) बुटीबोरी जि.नागपूर येथील पंचतारांकित एमआयडीसी जवळील चौकात दारुदुकानासमोर असलेल्या टपरी व ठेल्यावर लोक दारु प्यायला जात असल्याने व त्यापासून त्रास होत असल्याने राष्ट्रीय महामार्ग विभाग व पोलीस विभाग यांनी संयुक्तपणे कार्यवाही करुन चौकातील सदरचे अनधिकृत अतिक्रमण हटविले तसेच एमआयडीसी क्षेत्र व बुटीबोरी येथील सार्वजनिक ठिकाणी गोपनीयरित्या पाळत ठेऊन गस्त घालण्यात आली असता आक्षेपार्ह असे काही आढळून आले नाही.

(४) बुटीबोरी जि. नागपूर येथील पंचतारांकित एमआयडीसी जवळील चौक व चौकातील बस स्टॉप तसेच गावातील परिसर या ठिकाणी कार्यरत असलेल्या अनुज्ञप्त्यांमधून नियमानुसार मद्य वाहतूक खरेदी, विक्री बाबत कायद्याचे पालन करुन दक्षता घेण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच विभागाकडून वेळोवेळी अवैध दारु विक्री विरोधात मोहिमा आयोजित करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

---------------

## अहमदनगर जिल्हयात दुष्काळी अनुदानाचे वाटप प्रंलबित असल्याबाबत

**(८३) * १२४४३ डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिह्यात दुष्काळी अनुदान उपलब्ध होऊनही अद्याप ९५ हजार ४७५ बाधित रब्बी शेतकऱ्यांना काहीच मदत मिळाली नसून कोट्यवधी रुपयांचे वाटप प्रंलबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना त्वरीत अनुदान वाटप करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) रब्बी हंगाम २०१२-१३ चे अनुदानापैकी ५७.१९ टक्के इतक्या बाधीत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदान जमा करण्यात आलेले आहे.

रब्बी हंगाम २०१४-१५ चे अनुदानापैकी ८६.६० टक्के इतक्या बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदान जमा करण्यात आलेले आहे.

शिल्लक अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर तात्काळ जमा करणेबाबत संबंधित तहसिलदार यांना सूचना दिलेल्या असून उर्वरित शिल्लक अनुदान तात्काळ जमा करणेची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**निमसोड, (ता.खटाव, जि.सातारा) येथील शालेय विद्यार्थी व प्रवाशांच्या सोयीसाठी वडूज आगाराने मुक्कामी गाडी सुरु करणेबाबत**

**(८४) * ११५१३ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमसोड (ता.खटाव, जि.सातारा) येथील शालेय विद्यार्थी व प्रवाशांच्या सोयीसाठी वडूज आगाराने मुक्कामी गाडी सुरु करावी असे निवेदन ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी आगार प्रमुख वडूज यांना दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर निर्णय घेऊन शासनाने निमसोड येथे वडूजसाठी स्वतंत्र मुक्कामी गाडी सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) निमसोड येथील ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनाप्रमाणे निमसोड येथील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी दिनांक ०२.१०.२०१५ पासून सातारा-निमसोड-कामथी मुक्कामी फेरी सुरु करण्यात आली असून सदरचा मुक्काम दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी परतीला कामथी-निमसोड-वडुज ०६.१५ वा. अशी आणण्यात आली आहे. सद्या सदर फेरी चालनात असून निमसोड येथील विद्यार्थी सदर फेरीचा लाभ घेत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयातील दिवा-कोपर खाडीतून बेकायदेशीर वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(८५) * ११३२६ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील दिवा-कोपर या मध्य रेल्वे स्थानका दरम्यान असलेल्या खाडीतून गेल्या काही वर्षांत वाळू उपसा करण्यात आल्याचे दिनांक ५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागात रेल्वे प्रशासन दलदलीच्या भागात संरक्षक भिंत उभारत असली तरी बेकायदेशीर वाळू उपसा होत असल्याने त्याचा परिणाम प्रवाशांच्या जीवावर बेतण्याची शक्यता असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा प्रशासनाला या बेकायदेशीर वाळू उपसा करणा-यांवर कारवाई करण्याचे सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाईचे आदेश असूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(४) उक्त प्रकरणी शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) कोपर येथील खाडीपात्रात वाळूच्या अवैध उपशाबाबत दिनांक ३.८.२०१५ रोजी पाहणी केली असता, तेथे सक्शनपंपाचे साहित्य, पाईप व ड्रम आढळून आले.
(२) लोकप्रतिनिधी यांच्याकडून जिल्हाधिकारी ठाणे व तहसिलदार कल्याण यांना या संदर्भात निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) व (४) कोपर येथील खाडीपात्रात वाळूच्या अवैध उपशाबाबत दिनांक ३.८.२०१५ रोजी केलेल्या पाहणीत आढळून आलेले सक्शनपंपाचे साहित्य, पाईप व ड्रम जप्त करुन, अज्ञात व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

खाडीपात्रातील अवैध वाळू उत्खननास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, रेल्वे प्रशासन व पोलीस विभागास गस्त घालण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच उपविभागीय अधिकारी कल्याण त्यांच्या सनियंत्रणाखाली गस्ती पथके तयार करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत तपासणी करण्यात येत आहे.

खाडीकिनारी असलेल्या १४८ जमिन मालकांना त्यांच्या जागेत वाळूचा साठा केला जाणार नाही. याबाबत खबरदारी घेण्यास नोटीस देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औष्णिक विद्युत केंद्राच्या चिमण्यांवर प्लू गॅस डीस्ल्फरायझेशन संयंत्रे बसविण्याबाबत

**(८६) * ११०१९ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक २७१४ ला दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय हरीत लवादाच्या (Green Tribunal) नियमानुसार राज्यातील प्रत्येक औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या चिमण्यांवर प्लु गॅस डीस्ल्फरायझेशन (flu gas dsupherisation) चे संयंत्रे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्वच औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या चिमणीमधुन निघणाऱ्या धुरामध्ये आरोग्याला घातक असलेले सल्फरचे प्रमाण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा वायुरुपातील घातक असणारा सल्फर पावसाळ्यातील दमट हवामानात आरोग्यास अत्यंत घातक दुष्पपरीणाम देणाऱ्या सल्फुरीक ॲसीडमध्ये रुपांतरीत होतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील महानिर्मिती विभागांतर्गत औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या चिमणीवर प्लू गॅस डीस्ल्फरायझेशन (flu gas dsupherisation) चे संयंत्रे बसविण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहु संयंत्रांवर येणारा सर्वसाधारण खर्चाचा तपशील काय,
(६) नसल्यास, संयत्रे न बसविण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) महानिर्मिती कंपनीला मिळणाऱ्या कोळशामध्ये सल्फरचे प्रमाण अत्यल्प (०.४ ते ०.५%) असते. औष्णिक विद्युत केंद्रामधून उत्सर्जित होणाऱ्या धुरांकरिता उंच (२७५ मी) चिमणी बसविलेली असल्याने त्यातील घटकांचे विकीरण होते परिणामी प्रकल्पाच्या परिसरातील हवेमध्ये असणारे सल्फरडाय ऑक्साईडचे प्रमाण महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या मानाकनांपेक्षा कमी आहे.

-----------------

## राज्यात दुष्काळ जाहीर करण्याच्या पध्दतीत बदल करून नवीन पध्दत अवलंबविण्याबत

**(८७) * ११८६४ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुष्काळ जाहीर करण्याच्या पध्दतीत बदल करुन केंद्र शासनाच्या निकषानुसार २/३ महिने आधीच दुष्काळ जाहीर करण्याची नवीन पध्दतीत अवलंब करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नवीन पध्दतीची अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे,
(३) यामुळे अंतिम आणेवारी व दुष्काळग्रस्तांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) दिनांक ३.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये औरंगाबाद, नागपूर व अमरावती विभागाची खरीप हंगामाची सुधारीत पैसेवारी जाहीर करण्याची प्रचलित तारीख १५ नोव्हेंबर ऐवजी ३१ ऑक्टोबर व नागपूर विभागाची अंतिम पैसेवारीची प्रचलित तारीख १५ जानेवारी ऐवजी ३१ डिसेंबर करण्यात आली. तसेच प्रमाण उत्पन्न काढण्याच्या पध्दतीत केंद्र शासनाच्या धोरणानुसार बदल करण्यात आला आहे.

नवीन तंत्रज्ञानानुसार शास्त्रोक्त पध्दतीने पीक पैसेवारी घोषित करणे शक्य होई पर्यंत जुन्याच पध्दतीने पैसेवारी घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या १५७४७ गावांमध्ये दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयात रिक्षाचे लायसन्स, बॅच व बनावट परमिट देण्यात आल्याबाबत**

**(८८) * ११५७० श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात रिक्षाचे लायसन्स, बॅच नसतानाही आरटीओ कार्यालयाने जिल्हयात ४ हजार बनावट परमिट देण्यात आल्याचे दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३५ हजार रुपयांमध्ये एक परमिट विकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बनावट परमिट देणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) औरंगाबाद जिल्हयात ४ हजार बनावट परवाने देण्यात आले हे खरे नाही.

तथापि, दिनांक २०.०८.२०१५ रोजी वा त्यासुमारास औरंगाबाद जिल्हयात रिक्षाचे लायसन्स व बॅज नसतानाही प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून एका प्रकरणात ऑटोरिक्षा परवाना जारी झाला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी क्रांती चौक पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे भा.दं.वि.चे कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ नुसार गु.र.नं. ६६६/२०१५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस चौकशी सुरु आहे. त्याचप्रमाणे सदरहू प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वतंत्रपणे चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यातील विद्यार्थींना बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(८९) * १२५४९ श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील विद्यार्थींना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांच्या घरापासून शाळेपर्यत व शाळेपासून घरापर्यंत प्रवासाकरीता मानव विकास कार्यक्रमांतर्गत २२ बसेस उपलब्ध केल्या असून उर्वरित सहा बसेस मिळाल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुलींच्या जाण्यायेण्याचा प्रवास सुखकारक व्हावा म्हणून मागणी केलेल्या बसेस पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) मुलींना शाळेत जाण्या-येण्या करीताचा प्रवास सुखकारक व्हावा म्हणून मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याकरिता ५ बसेस अशा एकूण २० बसेसचा पुरवठा करण्यात आला व सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रापासून गोंदिया विभागातील चार तालुक्यांकरिता प्रत्येकी २ अतिरिक्त अशा ०८ बसेस पुरविण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे एकूण २८ बसेसचा पुरवठा गोंदिया जिल्ह्याकरिता करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड शहरातील मध्यवर्ती बसस्थानकातील अतिक्रमणे दूर करण्याबाबत

**(९०) * ११३३३ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील मध्यवर्ती बसस्थानक अतिक्रमणाच्या विळख्यात अडकले असून येथील व्दाराजवळच खादय पदार्थांची दुकाने, हातगाड्या तसेच फेरीवाले उभे असतात त्यामुळे वृद्ध महिला यांना येथे ये-जा करतांना त्रास होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्थानकात अनेक भाडेकरूनी त्यांना दिलेल्या जागेपेक्षा अधिक जागेचा वापर करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अतिक्रमणे दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी भाडेकरुवर शासनाने कोणती दंडात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) नांदेड मध्यवर्ती बसस्थानकात १० वाणिज्य आस्थापना धारकांनी महामंडळाने देऊ केलेल्या जागेव्यतिरिक्त अधिक जागेत उन्हापासून संरक्षण करिण्याकरिता तात्पुरती शेड उभारली होती. सदरच्या अनधिकृत जागेच्या वापराबाबत सर्व आस्थापनाधारकांना प्रतिबंध करण्यात आला आहे. परवानाधारकाने अनधिकृतपणे वापरलेल्या अतिरिक्त जागेचे मोजमाप करुन सदर जागेसाठी अतिरिक्त भाडेवसूलीबाबत संबंधीतांना विभाग नियंत्रकामार्फत दिनांक ०९.०७.२०१५ व दिनांक १७.०७.२०१५ रोजी नोटीस दिली आहे. बसस्थानकाबाहेरील दुकाने फेरीवाले यांना पोलीस व नगरपालिका प्रशासन यांच्या मार्फत हटविण्याबाबत महामंडळामार्फत पत्र व्यवहार केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील दुष्काळामुळे चारा व पाण्याची निर्माण झालेली टंचाई

**(९१) * ११६३५ श्री.अमरिशभाई पटे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात नैसर्गिक आपत्तीमुळे दुष्काळाने खरिप व रब्बी दोन्ही हंगाम वाया गेले असून चाऱ्याचा व पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय दिनांक २०.१०.२०१५ अन्वये सन २०१५-१६ च्या खरिप हंगामातील हंगामी पैसेवारी जाहिर करण्यात आली आहे. त्यानुसार अहमदनगर जिल्हयातील ५३५ गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली आहे.

खरीप पिके वाया गेल्यामुळे चाऱ्याचा प्रश्न काही अंशी निर्माण होण्याची परिस्थिती उद्भवली होती. परंतू माहे ऑक्टोबर मध्ये पाऊस झाल्याने चाऱ्याचा प्रश्न उद्भवला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**महानंद डेअरीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(९२) * १३६३६ अ‍ॅड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ८३११ ला दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानंद डेअरीमध्ये सुमारे १३० कोटी रुपयांचा गैरव्यवहार प्रकरणी शासनाने संचालक मंडळ दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास बरखास्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा लाचलुचपत विरोधी पथक तसेच सहकार विभाग यांच्याद्वारे स्वतंत्ररित्या चौकशी करण्याचे शासनाने ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सन २००५ मध्ये रु. १००.०० कोटीचा आर्थिक घोटाळा केल्या प्रकरणी आर्थिक गुन्हे मुंबई पोलीस यांच्याकडे गुन्हे दाखल झाले असून त्याबाबत मुंबई सत्र न्यायालयात प्रकरण सुरु आहे. मात्र, नुकतीच करण्यात आलेली कार्यवाही १३० कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराप्रकरणी सदरची कार्यवाही झालेली नसून अन्य कारणासाठी संचालक मंडळांच्या ऐवजी प्राधिकृत अधिकारी नियुक्तीचे आदेश सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७ अ अन्वये दिनांक २८/०९/२०१५ रोजी पारित केले आहेत.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य दूध वितरक वाहतुकदार संघ यांच्या प्रतिनिधींनी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई पोलीस यांच्याकडे तक्रार केली असून सदर प्रकरणी पोलीस विभागाकडून चौकशी करण्यात येत आहे. याशिवाय महासंघाच्या संचालक मंडळाने किंवा संचालक सदस्यांनी महासंघाच्या व शासनाच्या निधीचा अपहार केल्याच्या संदर्भात सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांच्यामार्फत छाननी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कर्जत (जि.रायगड) येथील कृषी अधिकारी आणि कृषी पर्यवेक्षकांना लाच घेताना पकडल्याबाबत**

**(९३) * १३४७० श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) येथील कृषी अधिकारी आणि तीन कृषी पर्यवेक्षकांना दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास लाच घेताना पकडण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर लाचखोरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) व (३) प्राप्त झालेल्या तक्रारीच्या आधारे चौकशी करुन कर्जत पोलीस ठाणे येथे दखलपात्र गु.र.क्र.नं.१२/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, १२, १३(१) (ड) सह १३(२) प्रमाणे दि.२४/७/२०१५ रोजी गुन्हा दाखल करुन, संबंधित तालुका कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व दोन कृषी सहाय्यक यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे ओवळा (ता.जि.ठाणे) येथे अवैध ब्रास दगडांचे उत्खनन केल्याबाबत**

**(९४) * १४०५८ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे ओवळा (ता.जि.ठाणे) येथील सर्व्हे नं. २०४ (नवीन सर्व्हे नं. ४) येथील मे. कॉसमॉस स्टोन क्वारी या कंपनीला सन २००८ मध्ये खनिजपट्टाधारक कंपनीने जवळपास ४२,९१२ ब्रास दगडांचे उत्खनन मंजूर क्षेत्राबाहेर केल्याने १३ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.कॉसमॉस स्टोन क्वारी या कंपनीला मंजूर करण्यात आलेल्या क्षेत्राच्या बाहेर अतिरिक्त जागा संपादित करुन अतिक्रमण केल्याच्या त्या परिसरातील व्यक्तींकडून तक्रारी आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दर सहा महिन्यांनी हिशोब तपासणी व स्थळ पहाणी करतेवेळी खनिकर्म अधिकाऱ्यांनी सदरील कंपनीवर अतिक्रमीत जागा व दंड वसुलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, जिल्हाधिकारी ठाणे यांनी त्यांच्या दि.२२/०२/२००८ च्या आदेशाद्वारे मे.कॉसमॉस स्टोन क्वारी यांनी मंजूर क्षेत्राबाहेर अवैधरीत्या ४२,९१२ ब्रास उत्खनन केल्याबद्दल रुपये १२,८४,३५,६१६/- एवढा दंड केलेला आहे.

(२) होय,

(३) व (४) प्रस्तुत दंडाच्या आदेशाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाखल केलेल्या पुनर्विलोकन अर्जामध्ये, प्रश्नाधीन जागेचे नव्याने सर्वेक्षण करुन दंड आणि स्वामीत्वधनाच्या रकमेबाबत आवश्यक ते आदेश पारित करण्याबाबत, आदेशित करण्यात आले आहे. त्यानुसार भूमिअभिलेख विभागाकडून प्रश्नाधीन जागेची मोजणी करुन सीमारेषा निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर क्षेत्रातून करण्यात आलेल्या उत्खननाची इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन मशीनद्वारे मोजणी करण्याबाबत उपसंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, कोल्हापूर यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## नागपूर येथील कृषी विभागात “सर्च” या संस्थेमार्फत करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेबाबत

**(९५) * ११९४९ श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील कृषी विभागाच्या कार्यालयाकडून २८२ पदासाठी भरती करण्याची प्रक्रिया “सर्च” या संस्थेमार्फत करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर येथील “सर्च” या संस्थेने या भरतीच्या नावाखाली बेरोजगार तरुणांकडून हजारो रुपये घेवून फसवणूक केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्थेविरुध्द तक्रारी असताना सुध्दा विभागीय कृषी सह संचालक, नागपूर यांनी विभागातील सर्व “आत्मा” प्रकल्प संचालकांना या संस्थेकडून आवश्यक असणारे कर्मचारी घेणेविषयी लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २ ते ५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीमध्ये "सर्च" या संस्थेने मुलाखती घेऊन त्यांची अंतिम निवड यादी जाहीर केलेली नसताना सुध्दा नविन निवड प्रक्रिया सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, "आत्मा" एम्प्लॉईज वेलफेअर असोसिएशन या कर्मचारी संघटनेने संस्थेविरोधात प्रशासनाकडे तक्रार करुनही प्रशासन या संस्थेस पाठीशी घालत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. सेवा पुरवठादार यांनी विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर यांना सदर पदभरतीसाठीच्या मुलाखतीकरिता आवेदन केलेल्या एकूण ३४४ आवेदकांपैकी दस्ताऐवज पडताळणीत पात्र ३०५ आवेदकांची यादी प्रस्तुत करण्यात आली व अर्जदारांकडून प्रक्रिया तसेच संस्थेचे मुलाखती शुल्क म्हणून रु.१०००/- इतकी रक्कम घेतल्याचे कळविले असल्याने सदर प्रकरणाची विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे.

(३) सदर संस्थेविरुध्द संचालक आत्मा कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही. शासन पत्र दिनांक ९ एप्रिल, २०१५ अन्वये कंत्राटी स्वरुपाची पदे बाहय स्त्रोताव्दारे भरण्याची सूचना असल्याने ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, सर्च रिसर्च प्रोफेशनल टेक्नॉलॉजी, चंद्रपूर यांचे दर सर्वात कमी आढळल्याने त्यांची निविदा मंजूर करण्यात आली. विभागीय कृषी सह संचालक नागपूर कार्यालयाकडून प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी सदर संस्थेशी समन्वय साधून आवश्यकतेनुसार मागणी नोंदवून मनुष्यबळ प्राप्त करुन घेणेविषयी दिनांक २९.९.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) दिनांक २ ते ४ सप्टेंबर, २०१५ या कालावधीमध्ये सर्च रिसर्च प्रोफेशनल टेक्नॉलॉजी चंद्रपूर या संस्थेने कंत्राटी पदाचे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचे कागदपत्र पडताळणी व मुलाखती घेतलेल्या आहेत. सहसंचालक, नागपूर यांच्या दिनांक २९.९.२०१५ चे पत्रान्वये दिलेल्या सूचनेप्रमाणे निवडप्रक्रिया सुरु केलेली आहे.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उदभवत नाही.

(७) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**मुंबई येथील कुर्ला, वरळी व गोरेगाव या दुध डेअऱ्याच्या खाजगीकरणाबाबत**

**(९६) * ११२९२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ६८५७ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कुर्ला, वरळी व गोरेगाव येथील एकमेव शासकीय आरे दूध बंद पडून खाजगीकरणाचा निर्णय घेण्यात आल्यामुळे या दुग्ध शाळेत तयार होणारी सर्व उत्पादने बंद करण्यात आल्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी (मुंबई) येथील आरे दुग्ध डेअरीत जुलै महिन्यात उत्पादन केलेल्या एनर्जी दुधाच्या सहा हजार बाटल्या वापरात न ठेवल्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुग्धविकास सचिवांनी एनर्जी उत्पादन करुन विक्रीचे कंत्राट पुण्याचा शीतल आर्च कंपनीला पुन्हा मुदतवाढीने दिले असून वरळी येथे तयार होणाऱ्या एनर्जीची किंमत रु.२२ तर शितल आर्चने तयार केलेल्या एनर्जीची किंमत रु.२५ आहे वास्तविक आरेने स्वत:चे एनर्जी उत्पादन चालु ठेवणे गरजेचे असतांना ते बंद पाडण्यात आल्याने बाजारात विकण्यात येणाऱ्या शितल आर्चच्या एनर्जीची किंमत रु.२५ असल्याने ग्राहकांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या दुग्ध शाळेतून तयार होणाऱ्या उत्पादनांना मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने पुर्ववत उत्पादने तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

(५) अ) वरळी दुग्धशाळेत उत्पादीत होणाऱ्या एनर्जी बाटल्यांकरिता आवश्यक असलेला अल्कोहोल परीक्षा नकारार्थी असणारे दूध नियमितपणे उपलब्ध होत नाही.

ब) एनर्जी उत्पादनाची सयंत्रे ही ४७ वर्षे जुनी असल्याने त्यांचे नियम आयुष्यमान संपल्याने एनर्जी उत्पादनामध्ये सातत्य राखता येत नाही.

क) बृहन्मुंबई दूध योजना व राज्यातील शासकीय दूध योजनांमार्फत दूध व दुग्धजन्य पदार्थाची विक्री कायम ठेऊन शासनाच्या पॅकींगपेक्षा भिन्न पॅकींगमध्ये दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन बाहेरून करुन घेऊन रॉयल्टी तत्वावर त्याची विक्री करण्याकरिता नव्याने ई-निविदा पूर्ण करण्यात आली असून १ वर्षाच्या कालावधीकरिता मे. कुतवळ फुड्स प्रा.लि. यांचे ईनिविदेतील दर अधिकतम असल्याने त्यांना ठेका प्रदान करण्यात आला असून त्यांचेशी दिनांक ३०.१०.२०१५ रोजी करारनामा करण्यात आला आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दाभोळ (जि.रत्नागिरी) येथील बंद पडलेला वीज प्रकल्प पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(९७) * ११९८९ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ७५५१ ला दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील दाभोळ वीज प्रकल्प सन २०१३ पासून गॅस पुरवठा होत नसल्याने बंद पडलेला हा प्रकल्प पुन्हा सुरु होणार असल्याचे मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दाभोळ येथील वीज प्रकल्पातून रेल्वेला वीज देण्याच्या करारामुळे राज्याचे २५० कोटी रूपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पास ७ हजार ५०० कोटी रुपयांची सवलत तसेच शासनाकडून व्हॅट, सीएसटी आणि प्रवेश कर, जकातीमधून सूट देण्यात येणार असून या प्रकल्पामुळे शासनावर ३५० कोटींचा अतिरिक्त भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पातून किती मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे, साधारणत: हा प्रकल्प केव्हापर्यंत कार्यान्वित होईल, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, वीज वितरणाची जबाबदारी किमान राज्याकडे ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दाभोळ, जि.रत्नागिरी येथील प्रकल्प रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रा. लि. (RGPPL) कंपनी मार्फत केंद्रशासनाच्या पुढाकाराने पॉवर सिस्टीम डेव्हलपमेंट फंड (PSDF) योजनेतंर्गत सुरू करण्याचे नियोजित आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) PSDF योजनेखाली सदर वीज प्रकल्पातून ५०० मे.वॅ. इतकी वीज निर्मिती होणार असून ही वीज रेल्वेस पुरविण्यात येणार आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याची कार्यवाही RGPPL कंपनीकडून सुरू आहे.

(५) केंद्रीय विद्युत नियामक आयोगाच्या दि. ५.११.२०१५ च्या आदेशानुसार रेल्वे मानीव वीज वितरण परवानाधारक असल्याने, मुक्त प्रवेशाद्वारे (Open Access) वीज घेण्याचे अधिकार रेल्वेस आहेत. त्यामुळे रेल्वेला राज्याच्या ग्रीड मधून सदर वीज पुरवठा होईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात युरीया खताच्या किंमती दुप्पटीने वाढल्याने कापूस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याबाबत

**(९८) * ११६०२ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.राजेंद्र मुळक, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यंदाच्या वर्षी युरीया खताच्या किंमती मागील वर्षाच्या तुलनेत दुप्पटीने वाढल्याने विदर्भात कापूस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खतांच्या व बी-बियाणांच्या किंमती आटोक्यात ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. मागील वर्षाच्या तुलनेत युरीया खताच्या किंमतीत कोणतीही वाढ झालेली नाही.

(२) युरीया खताच्या किंमती नियंत्रित व स्थिर असून इतर खतांच्या किंमती ठरविण्याचे अधिकार केंद्र शासनाच्या मुलद्रव्याधारित धोरणानुसार खत उत्पादक कंपन्यांना आहेत.

बियाणासंबंधीच्या कायद्यात बियाणे विक्री किंमतीवर नियंत्रण आणण्याची तरतूद नाही. तथापि, कापूस बियाण्यांचा विक्री किंमती नियंत्रित करण्यासंदर्भात राज्य शासनाचा कायदा आहे. त्यानुषंगाने दि.०८.०६.२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्य शासनाने बी.टी. कापूस बियाण्यांच्या विक्री किंमती रु.१००/- ने कमी केलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ऑनलाईन सातबारा देण्याचा निर्णय घेऊनही सातबारा रांगा लावून घेत असल्याबाबत

**(९९) * १२१४८ श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑनलाईन सातबारा देण्याचा निर्णय घेऊनही सातबारा रांगा लावून घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटासह अमरावती जिल्ह्यात ऑनलाईन प्रक्रियेद्वारे सातबारा उतारे मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) राज्यातील शेत जमिनींचे अधिकार अभिलेख (गाव नमुना नंबर ७/१२) संगणकीकृत होऊन ऑन लाईन पध्दतीने अद्ययावत व्हावेत या दृष्टीने “ई-फेरफार प्रकल्प” कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक संगणक आज्ञावली राष्ट्रीय सूचना केंद्र, पुणे मार्फत विकसीत करण्यात आली असून राज्यातील विविध तालुक्यांतील अधिकार अभिलेखांच्या डॅटा सीडीज् “स्टेट डॅटा सेंटर” वर अपलोड करण्यात येत आहेत. आतापर्यंत एकूण ३५८ तालुक्यांपैकी १९७ तालुक्यांचा डॅटा सीडीज् स्टेट डॅटा सेंटरवर अपलोड करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित तालुक्यांचा डॅटा सीडीज् अपलोड करण्याची तसेच संगणक आज्ञावलीतील किरकोळ तांत्रिक अडचणी दूर करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

अमरावती जिल्ह्यातील एकूण १४ तालुक्यांपैकी १३ तालुक्यांच्या अद्ययावत डॅटा सीडीज् अपलोड करण्यात आल्या आहेत व त्यानुषंगाने ई-फेरफार प्रणालीद्वारे ऑनलाईन फेरफार घेणे व मंजूर करणे याबाबतची प्रक्रीया १३ तालुक्यांमध्ये सुरु करण्यात आली आहे.

उर्वरित अमरावती या एका तालुक्यातील अधिकार अभिलेखांचे डॅटा अपडेशन करण्याचे काम सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण करुन अमरावती तालुक्यात देखील ई-फेरफार प्रणालीतून ऑनलाईन फेरफार घेण्याची कार्यपध्दती ३१ मार्च, २०१६ पर्यंत सुरळीतपणे कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

दरम्यान तालुक्यात ई सेवा केंद्र तसेच तलाठी यांचेकडून संगणकीकृत गा.न.नं.७/१२ उतारे वितरीत करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेवळे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे होत असलेली अवैध वाळु उपसा रोखण्याबाबत**

**(१००) * ११३८६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवळे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भीमा नदीतून बेसुमार वाळू उपशामुळे अनेक जलचर जीव नामशेष झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर येथे रेल्वे पूल ते श्री विष्णुपद मंदिर या दरम्यानच्या वाळवंटातील वाळूचा उपसा करण्यास शासनाने बंदी घातलेली असतांना महसूल प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अहोरात्र वाळूचा उपसा केला जात असल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे वाळवंटात जागोजागी मोठमोठे खड्डे पडल्याने नदीच्या घाटात गटारातील पाणी नदीत मिसळत असून नदीकडे जाणाऱ्या भाविकांना घाण पाण्यातून चालत जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथे वाळू उपसा बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) चंद्रभागा घाटानजिक जानेवारी २०१५ मध्ये बॅरेकेटिंग करण्यात आले आहे. त्यामुळे नदीपात्रात वाहने जाऊ शकत नसल्याने अवैध वाहतुकीस आळा बसला आहे.

आषाढी यात्रेपूर्वी भिमा नदीपात्रातील खड्डे बुजविण्यात आले आहेत. नदीच्या घाटात गटारीतील पाणी मिसळून नदीकडे जाणाऱ्या भाविकांना घाण पाण्यातून जावे लागते, अशी वस्तुस्थिती नाही.

२०१५-१६ या आर्थिक वर्षात पंढरपूर तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीच्या ७८ प्रकरणात रुपये ७३.६३ लाख एवढा दंड वसूल करण्यात आला असून, १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथील जागेवर अलिगड मुस्लिम विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याबाबत

**(१०१) * ११४७६ श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथील सुमारे २०० एकर जागा अलिगड मुस्लिम विद्यापीठ केंद्र तसेच इस्लामिक रिसर्च सेंटर उभारण्यासाठी देण्याचा प्रस्ताव मंजूरीअभावी पडून असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला मंजूरी देवून या विद्यापीठास जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व निर्णय घेण्यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) खुलताबाद, औरंगाबाद येथील जागा अलिगड मुस्लिम विद्यापीठ केंद्राकडे वर्ग करावी किंवा कसे ही बाब विचाराधीन आहे.

(२) व (३) सदर शासकीय जागेच्या वाटपाबाबतचा धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्याने त्या अनुषंगाने महसूल व वन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, पर्यटन विभाग, वित्त विभाग यांचेकडून अभिप्राय प्राप्त करुन घेतल्यानंतर उचित निर्णय घेता येईल.

-----------------

## रायगड जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व खनिज उत्खनन करणाऱ्यांवर कार्यवाही करण्याबाबत

**(१०२) * ११७२६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी वाळू व्यावसायिक व खाणमालकांनी वाळूचे उत्खनन केले, वाळूचा लिलाव घेतला, खनिज उत्खनन केले याबाबत महसूल विभागाने रॉयल्टीची रक्कत भरणा करण्यासाठी वर्षभरापासून संबंधितांना नोटीसा पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यात अवैधपणे वाळू उत्खनन केल्याबद्दल दिनांक १ एप्रिल, २०१४ ते ३१ मे, २०१५ अखरे किती गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, पेण (जि.रायगड) तहसील कार्यालयातील कारकून श्री.ज्ञानेश्वर बोडके यांनी वाळू उपसा करण्यासाठी बनावट परवाने तयार केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिनांक २ जुलै, २०१५ रोजी श्री.ज्ञानेश्वर बोडके यांनी केलेल्या बनावट परवान्यानुसार १५० ब्रास वाळू मुंबईतील शिवडी ठाण्याचे पोलीस निरिक्षक पिकेकर यांच्या पथकाने हस्तगत केली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वाळू उत्खनन केल्याचा गुन्हा नोंद झाल्यावर किती इसमांवर दंडात्मक कारवाई करून रकमेची वसूली करण्यात आली आहे,
(६) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०१४ ते ३१ मे, २०१५ अखेर अवैध वाळू उत्खनन करणा-यांकडून किती ब्रास वाळू साठा जप्त करण्यात आला आहे,
(७) असल्यास, वाळू उत्खनन करणाऱ्यांपैकी किती व्यावसायिकांनी नोटीसानुसार रॉयल्टी रक्कम भरणा केली असून किती व्यावसायिकांनी रक्कम भरलेली नाही,
(८) अद्याप, उक्त प्रकरणी शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,
(२) या कालावधीत ४६ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.
(३) श्री.ज्ञानेश्वर बोडके, लिपीक तहसिल कार्यालय पेण यांनी वाळू वाहतुकीसाठी तहसिलदार पेण यांनी निर्गमित केलेल्या परवान्यात खाडाखोड करुन आकडा वाढवून लिलावधारकास सहाय्य केल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) होय,
(५) वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबात गुन्हा दाखल केलेली ४६ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही.
(६) या कालावधीत रेतीचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांकडून ८१९६ ब्रास रेतीसाठा जप्त करण्यात आला आहे.
(७) मागणी नोटीसनुसार ३० व्यावसायिकांनी रक्कम भरणा केली असून, ८६ व्यावसायिकांनी रक्कम भरलेली नाही.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे खंबाळे (ता.त्र्यंबक, जि.नाशिक) येथील शेतातील माती व मुरूम उत्खनन झाल्याबाबत

**(१०३) * १२०४६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महसुल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खंबाळे (ता.त्र्यंबक, जि.नाशिक) या गावातील जयदीप ठुबे व कावेरी धनंजय आडके यांनी आपल्याच शेतातील माती व मुरुम काढला म्हणून महसूल विभागाने तब्बल ३१६ कोटी रुपयांचा दंड आकारल्याबाबत माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे खंबाळे ता.त्र्यंबकेश्वर येथील गट नं. १०७ चे सपाटीकरणासाठी केलेल्या उत्खननाबाबत संबंधितांना दंडाची नोटीस देउन खुलासा मागविण्यात आला आहे. याबाबत संबंधितांनी केलेला खुलासा विचारात घेवून सदर उत्खननाची इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन मशिनव्दारे मोजणी करण्यात आली आहे. सहाय्यक संचालक नगररचना, नाशिक यांच्याकडील तात्पुरते मंजूर रेखांकन, सदर ठिकाणी झालेले उत्खनन व सपाटीकरण याची खातरजमा करुन नियमानुसार उचित दंड आकारण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाकरीता राज्य शासनाच्या हिश्याचा निधी उपलब्ध करणेबाबत

**(१०४) * ११८३९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १०२३२ ला दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २ जून, २०१५ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गासाठी आवश्यक असलेला निधी रु. १४१३ कोटी उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ करीता रु.३३ कोटी एवढा अल्पनिधी राज्य शासनाने उक्त रेल्वे मार्गासाठी उपलब्ध केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१५-१६ च्या केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पातील तरतुदीप्रमाणे राज्य शासनाच्या हिश्याचा निधी योग्य प्रमाणात उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रेल्वेमार्ग पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) रेल्वे अर्थ संकल्प २०१५-१६ मध्ये सदर प्रकल्पाकरिता रु. १२५.५० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या आर्थिक सहभागातून राबविण्यात येणाऱ्या रेल्वे प्रकल्पाकरिता आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये रु. ४८ कोटी इतका निधी अर्थ संकल्पीत करण्यात आल आहे. तसेच रु. २०.५० कोटी इतकी पुरवणी मागणी शासनाच्या विचाराधीन आहे. त्या अनुषंगाने प्रकल्पाकरिता अतिरिक्त निधी मार्च २०१६ पर्यंत उपलब्ध करुन दिला जाईल.

-----------------

**एलएसडी ची तस्करी बंद करण्याबाबत**

**(१०५) * १३५७२ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोव्यातून एलएसडी आयात करुन पुण्यात त्याची मोठया प्रमाणात विक्री होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एलएसडी तस्करी बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) गोव्यातून एलएसडी आयात करुन पुण्यात त्याची मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याने माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वीज मंडळाकडून ग्राहकावर होत असलेल्या अन्यायाबाबत**

**(१०६) * ११७७७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज कायदा २००३ च्या कलमाप्रमाणे वीज खंडीत करण्यापूर्वी १५ दिवस अगोदर ग्राहकांना लेखी नोटीस न देणे तसेच वीज नियमक आयोग २००३ च्या कलमाप्रमाणे अधीक्षक अभियंता यांनी ग्राहक गाऱ्हाने तक्रार निवारण मंच स्थापन न करणे असे प्रकार करुन मनमानी कारभार चालविल्याबाबत अधिक्षक अभियंता यांच्या कारभाराबाबतचा आक्षेप स्थानिक लोकप्रतिनिधी (परभणी-हिंगोली) यांनी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष ग्राहक संरक्षण समिती व प्रधान सचिव, ऊर्जा मुंबई यांच्याकडे माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधीक्षक अभियंता व त्यांची यंत्रणा यांच्या मनमानी कारभारास तसेच कायद्याचा अनादर करुन सुरु असलेल्या प्रक्रिये बाबतची चौकशी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष ग्राहक संरक्षण समिती व प्रधान सचिव यांच्या स्तरावरुन कोणकोणत्या सुचना व कारवाई करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, वरील नियमाचा भंग न होता ग्राहकांना त्यांचे अधिकार मिळावेत यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना जिल्हाधिकारी यांनी केली आहे,

(४) असल्यास, वीज कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाकडून व जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयामार्फत अधिक्षक अभियंता, संवसू मंडल, महावितरण, परभणी यांच्याकडून मुद्देनिहाय अहवाल मागविण्यात आला होता.

(३) वीज कायदा, २००३ मधील प्रचलित नियमानुसार महावितरण कंपनीतर्फे थकबाकीदार वीज ग्राहकाकडून थकीत वीज बिलाची रक्कम वसूल करण्याकरीता प्रविभागाअंतर्गत संबंधित उपविभागीय अधिकारी यांना वेळोवेळी सूचित करण्यात येते. तसेच वीज कार्यालयात तक्रार प्राप्त होताच सदरील तक्रारीबाबत महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे कार्यवाहीस्तव संबंधित उपविभागीय अधिकारी यांना सूचित करण्यात येते. कायद्याचा अनादर व ग्राहक हिताचा अवमान होत नसून, ग्राहक हिताचे संरक्षण करुनच वसुली करणेबाबत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना वेळोवेळी सूचित करण्यात येते. महावितरणतर्फे मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्र भांडूप व पुणे येथे स्थापन करुन त्यामार्फत फ्युज ऑफ कॉल, बिलींग तक्रारी, नवीन विद्युत कनेक्शन व इतर सेवा ऑनलाईन पुरविण्यात येत आहे. महावितरणाच्या परभणी मंडल कार्यालयामध्ये अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष वीज ग्राहकांच्या तक्रारी सोडविण्याकरीता स्थापन करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ब्रिटीशकालीन निर्धारित पीक आणेवारी असलेल्या पध्दतीत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने बदल करणेबाबत

**(१०७) * ११०८३ श्रीमती शोभाताई फडणवीस : तारांकित प्रश्न क्रमांक २९७४ ला दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पीक आणेवारी ब्रिटीशकालीन निर्धारित असलेल्या पद्धतीत बदल करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय,

(२) असल्यास, सदर पीक आणेवारी पध्दतीत बदल करतांना शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने बदल करणार काय,

(३) असल्यास, नव्या पीक पध्दतीत कोणत्या नविन उपाययोजना लागू करणार,

(४) असल्यास, केव्हा,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) होय.

दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ रोजी पीक पैसेवारी पध्दतीबाबत सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महानिर्मितीच्या परळी (जि.बीड) वीज केंद्रातील पाण्याअभावी बंद पडलेली वीज पूर्ववत सुरू करण्याबाबत**

**(१०८) * १११९५ श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मितीच्या परळी (जि.बीड) औष्णिक विद्युत केंद्रातील पाचही संच पाण्याअभावी पूर्णपणे ठप्प झाली आहे. ११.३० मेगावॅट वीज निर्मिती क्षमता असतानाही येथून सध्या एक युनिटही वीजनिर्मिती होत नसल्यामुळे या प्रकल्पाचा स्थिर खर्च म्हणजे प्रकल्पाच्या कर्जावरील व्याज, कर्मचाऱ्यांचे पगार आणि प्रशासकीय खर्चाचा महिन्याला ६३.२५ कोटी रुपयांचा भुर्दंड वीज ग्राहकांना सहन करावा लागणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेरिट डिस्पॅच ऑर्डरमध्ये मंजूर केलेल्या दरापेक्षा परळीचा दर जास्त असल्याचे कारणे देत महावितरणने परळीचा फिक्स चार्ज नाकारुन वीज ग्राहकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर केंद्रातील बंद असलेले संच पुर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) परळी औष्णिक विद्युत केंद्रातील पाचही संचातील वीज निर्मिती पाण्याअभावी पूर्णपणे बंद असल्याचे खरे आहे. तथापि, सदर प्रकल्पासाठी सद्य:स्थितीत फक्त अत्यावश्यक कर्मचारी कार्यरत असून इतर प्रशासकीय खर्च ही कमीत कमी केला जात आहे.

(२) महानिर्मिती कंपनीकडून आकारला जाणारा स्थिर आकार हा महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या वीज दर विनियम, २०११ प्रमाणे आकारण्यात येतो.

(३) परळी औष्णिक विद्युत केंद्रातील संच सुरु ठेवण्याकरिता पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत जलसंपदा विभागाशी वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तथापि, राज्यात झालेल्या कमी पर्जन्यमानामुळे माजलगांव/जायकवाडी धरणात अत्यल्प पाणी साठा असल्यामुळे वीज निर्मिती करिता पाणी सोडण्यात आले नाही. भविष्यात पाण्याची उपलब्धता होण्याच्यादृष्टीने नांदेड शहरातील सांडपाणी प्रक्रिया करुन वीज निर्मितीसाठी वापरण्याबाबत तपासणी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वडगाव हवेली, संजयनगर-शेरे, पाडळी-केसे, सुर्ली, शेणोली, नांदलापूर (ता.कराड, जि.सातारा) येथील दगड खाणीमध्ये बेकायदा होत असलेल्या उत्खननाबाबत**

**(१०९) * ११४१८ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव हवेली, संजयनगर-शेरे, पाडळी-केसे, सुर्ली, शेणोली, नांदलापूर (ता.कराड, जि.सातारा) येथील दगड खाणीमध्ये बेकायदा सुमारे ३ लाख ७२ हजार ७६४ ब्रास डबरचे उत्खनन केल्याप्रकरणी तालुक्यातील ३० दगडखाण मालकांना एकूण ९० कोटी रूपयांच्या दंडाच्या नोटीसा कराड तहसिलदार कार्यालयाने बजावल्या असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कराड मधील ३० दगडखाण मालकाकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नात नमूद केलेल्या गावातील ३० खाणपट्टाधारकांनी विनापरवानगी ३,७२,७६४ ब्रास दगडाचे उत्खनन केल्याचे आढळून आल्यामुळे, तहसिलदार कराड यांनी संबंधितांविरुध्द दि. ११/०९/२०१५ रोजी रुपये ८९,४६,३४,१७६/- एवढ्या रकमेचे दंडाचे आदेश पारित केले आहेत.

(२) सदर दंडाच्या आदेशाविरुध्द २६ खाणपट्टाधाराकांनी उपविभागीय अधिकारी कराड यांच्याकडे अपिल दाखल केले आहे.

सदर दंडाच्या रकमेच्या वसुलीसाठी तहसिलदार कराड यांनी सर्व खाणपट्टाधारकांना महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार मागणी नोटीस दिली आहे. तसेच सर्व खाणी सिल केल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलडाणा) येथील तहसिल कार्यालयातून गारपीटग्रस्त शेतक-यांना शासनाची मदत न मिळाल्याबाबत**

**(११०) * १२५७१ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथे सन २०१४-२०१५ मध्ये अतिवृष्टी व गारपीटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतक-यांना नुकसान भरपाईपोटी शासनाने जाहीर केलेल्या पॅकेज नुसार अनुदान त्यांच्या खात्यात जमा झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-याचे खाते क्रमांक चुकविल्यामुळे अनुदान हे दुस-या व्यक्तीच्या खात्यात जमा झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे गारपीटग्रस्त शेतक-याला तहसिल कार्यालयाच्या तसेच बँकेच्या चकरा माराव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. प्राप्त अनुदानापैकी ९६ टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.

(३) हे अंशतः खरे आहे. किरकोळ प्रमाणात अशा घटना घडलेल्या आहेत. तथापि, असा प्रकार घडलयाचे संबंधित शेतकऱ्यांनी लक्षात आणून दिल्यानंतर संबंधित बँकेच्या मदतीने अशी रक्कम सदरहू शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

(४) खाते क्रमांक किंवा काही दुरुस्ती असल्यास संबंधित शेतकरी कार्यालयात येतात.

(५) संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये नुकसान भरपाईचे अनुदान जमा करण्याचे काम चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अल्पसंख्यांक समाजातील तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या पदविकाधारक विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती रक्कम वाढविणेबाबत

**(१११) * १३८८९ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्यांक समाजातील तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या ५० टक्के वा त्यापेक्षा अधिक गुण असणाऱ्या पदवी व पदविकाधारक विद्यार्थ्यांना रक्कम रुपये ५ हजार इतकी शासनामार्फत शिष्यवृत्ती देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी म्हणून ५० ते ६० हजार रुपये भरावी लागत असल्याने शिष्यवृत्तीची रुपये २५ हजार ही सध्या मिळणारी रक्कम फारच कमी पडत असल्याने ती रक्कम शैक्षणिक फीच्या प्रमाणात वाढवून ती ५० हजार रुपये इतकी देण्यात यावी अशी मागणी अल्पसंख्यांक विद्यार्थी व त्यांचे पालकांकडून गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणात असतांनाही फक्त ४८ हजार ७५ विद्यार्थ्यांना केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती देण्यात येते. त्यामुळे अनेक विद्यार्थी केंद्र पुरस्कृत लाभांपासून वंचित राहत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शिष्यवृत्ती, पोस्टमॅट्रीक व प्री मॅट्रीक स्कॉलर शिष्य व सेंट्रल सेक्टर स्कीम या नावाने प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थी संख्या ४८ हजारावरुन १ लाख विद्यार्थी संख्या करण्याबाबत, शिष्यवृत्तीची अनुदान रक्कम वाढविण्याबाबत तसेच पालकांच्या अल्प वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये २ लाख रक्कमेवरुन रुपये ४ लाख करण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थी व त्यांचे पालकांकडून शासनाकडे वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) नाही. इयत्ता १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र पुरस्कृत प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती, कनिष्ठ महाविद्यालयातील व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त (उदा.बी.ए., बी.कॉम, बी.एसी) विद्यार्थ्यांसाठी केंद्र पुरस्कृत पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती व तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र पुरस्कृत, मेरीट-कम-मीन्स शिष्यवृत्ती तसेच राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती देण्यात येते.

(५) नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मासेमारी करण्यासाठी समुद्रात जाणाऱ्या बोटीसाठी असलेली कुपन पध्दत बंद करण्याबाबत

**(११२) * १२२५८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरी सुरक्षेसाठी मासेमारी करायला जाणाऱ्या प्रत्येक बोटीची माहिती देणारे कुपन नेमणूक केलेल्या खाजगी कंपनीला भरुन देण्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ पासून सक्तीचे केल्यामुळे मच्छिमारांना अडचणींना तोंड द्यावे लागत असून मच्छिमारांचा वेळ वाया जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार मच्छिमारांचा वेळ वाया जाऊ नये म्हणून कुपन पध्दत बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) सागरी सुरक्षेच्या दृष्टीने कुपन (टोकन) पध्दत बंद न करता अधिक नौका असलेल्या बंदरात मच्छिमारांचा वेळ वाया जाऊ नये म्हणून आवश्यक असल्यास मनुष्यबळ वाढवून किंवा आधुनिक पध्दतीने RFID प्रणालीवर टोकन देण्याची प्रक्रिया गतिमान करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सावंगी (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथे शासकीय कृषी तंत्र विद्यालय व वसतिगृहात मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत**

**(११३) * १२३०८ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंगी (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथे शासकीय कृषी तंत्र विद्यालय व वसतीगृहात मुलभूत सुविधांचा अभाव असून विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार त्या ठिकाणी सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, अंशत: खरे आहे. सावंगी (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथील शासकीय कृषी तंत्र विद्यालयाच्या वसतीगृहात मुलभूत सुविधांचा अभाव आहे.

(२), (३) व (४) विद्यापीठ अभियंता, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी तपासणी केली असून तपासणीत विद्यार्थ्यांची असुविधा होत असल्याचे दिसून आले आहे. सावंगी (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथील शासकीय कृषी तंत्र विद्यालयाच्या वसतिगृहात मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**हवामानावर आधारित फळ पीक विमा योजनेच्या हप्त्यात केलेली वाढ कमी करण्याबाबत**

**(११४) * १२४४४ डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी परिस्थिती असतांना हवामानावर आधारित फळ पीक विमा योजनेच्या हप्त्यात कंपनीने वाढ केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर जिल्ह्याला या योजनेतून वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फळ उत्पादक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी व वाढीव हप्ता कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

आंबिया बहार सन २०१५-१६ करिता दिनांक १९.८.२०१५ रोजी निविदा उघडण्यात आलेल्या निविदांमध्ये भाग घेणाऱ्या कंपन्यांनी काही फळपिके व काही जिल्ह्यांकरिता मागील वर्षापेक्षा अधिक दर नमूद केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) विमा कंपन्यांशी दि.३१ ऑगस्ट, २०१५ व दि. १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वाटाघाटी करण्यात आल्या आहेत.

-----------------

## कऱ्हाड (जि.सातारा) तालुक्यातील कोळेवाडी-शिंदेवाडीत शेतकऱ्यांच्या जनावरांना चारा उपलब्ध करून देण्याबाबत

**(११५) * ११५०० श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) क-हाड (जि.सातारा) तालुक्यातील कोळेवाडी-शिंदेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील खाजगी मात्र पूर्वीपासून पाळीव जनावरांसाठी खुल्या असलेल्या डोंगरातील पड क्षेत्रात काही लोकांनी कुळ कायद्याने मालकी हक्क दाखवून पाळीव जनावरांसाठी या क्षेत्रात बंदी घातली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील मेंढपाळीसह शेतक-यांच्या जनावरांच्या चा-याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने चा-याअभावी जनावरे विकण्याची वेळी आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुग्ध व्यवसायावर पुर्णत: अवलंबून असलेल्या या गावात चारा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) क-हाड (जि.सातारा) तालुक्यातील मौजे कोळेवाडी-शिंदेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील जुना सर्व्हे नं.६६ (नवीन सर्व्हे नं.१९) क्षेत्र हे.१८३.४३ आर ही जमीन अधिकार अभिलेखावरुन खाजगी मालकीची असल्याचे दिसून येते. तसेच या जमिनीवर कुळे असल्याचेही दिसून येते. मात्र, सदर कुळांना महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम च्या कलम-३२ ग अन्वये विक्री आदेश झालेले नाहीत. सदर मिळकतीचे गा.न.नं.७/१२ चे अवलोकन केले असता, सदर मिळकतीवर “जनावरे चाऱ्यासाठी राखीव” अशा स्वरुपाची नोंद दिसून येत नाही.

कराड तालुक्यातील कोळेवाडी-शिंदेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरातील पड क्षेत्रात लोकांनी कुळ कायद्याने मालकी दाखवून जनावरांसाठी या क्षेत्रात बंदी घातल्याबाबत कोणतीही तक्रार जिल्हाधिकाऱ्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात खासगी कंपन्यांकडून टुरिस्ट वाहनांची बेकायदा वाहतूक सुरू असल्याबाबत**

**(११६) * ११३२७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या परिवहन खात्याची परवानगी न घेताच शहरात खासगी कंपन्यांकडून टुरिस्ट वाहनांमार्फत प्रवासी वाहतूक सुरु असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खासगी कंपन्यानी प्रवास वाहतुकीसाठीची नियमांचे उल्लघन करून मनमानी प्रवासी भाडे आकारीत असल्याबाबतच्या अनेक तक्रारी असतानाही त्याकडे प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि वाहतूक पोलीस दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी खासगी कंपन्यांकडून होणाऱ्या प्रवासी वाहतूकीवर निर्बंध आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) याबाबत दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या दैनिक सकाळ, पुणे या वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे. तसेच टॅक्सी युनियनकडून याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) टुरिस्ट टॅक्सी चालकांकडून/ परवानाधारकांकडून परवानाच्या अटी व शर्तीचा भंग होत असल्याबाबत परिवहन विभागाकडून मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण्याच्या कार्यक्षेत्रात दि.१२/१०/२०१५ ते दि.२१/१०/२०१५ पर्यंत विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आली. सदर तपासणी मोहिमेत एकूण १४७३ टुरिस्ट टॅक्सीची तपासणी करुन एकूण ३५३ दोषी टॅक्सी चालकांकडून तडजोड शुल्क व कर मिळून रु. ९.६१ लाख एवढी वसूली करण्यात आली.
(३) माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रवासी व वाहन चालक यांच्यात संपर्क साधून देणाऱ्या अॅग्रीगेटर बाबत मोटार वाहन कायदयात तरतूद नाही. तथापि, याबाबत उपाययोजना करण्यासाठी राज्यात सिटी टॅक्सी स्किम, २०१५ ही नवीन योजना लागू करण्यासाठी प्रारुप नियमावली तयार करुन जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्ह्यातील आरटीओ कार्यालयातील वाहनधारकांची विविध कामांसाठी सादर केलेली कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत**

**(११७) * ११५७१ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील आरटीओ कार्यालयात वाहनधारकांची विविध कामांसाठी सादर केलेली कागदपत्रे ठिकठिकाणी ढीग पडून असल्यामुळे अनेक वाहनधारकांची कागदपत्रे गहाळ झाली असल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कागदपत्रांअभावी कामे रखडत असल्याने वाहनधारकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने संबंधितांवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कंधार तालुक्यातील (जि.नांदेड) येथे दहिकळंबा येथे विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा लोंबकळल्या असल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाल्याबाबत**

**(११८) * ११३३४ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार तालुक्यातील (जि.नांदेड) येथे दहिकळंबा येथे विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा लोंबकळल्या असल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोंबकळलेल्या तारा दुरुस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे दहिकळंबा येथे विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा लोंबकळत असल्याचे महावितरण कंपनीच्या संबंधित शाखा अभियंत्याच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी सदर तारा व पोल तात्काळ सुस्थितीत करुन दि.२९.०९.२०१५ रोजी वीज पुरवठा सुरळीत केला आहे. सद्य:स्थितीत मौजे दहिकळंबा येथील तारा सुस्थितीत असून तेथे अपघातजन्य परिस्थिती नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राकरीता जमिनी दिलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याबाबत

**(११९) * ११६३८ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राकरिता स्थानिक शेतकऱ्यांचे ११ हजार हेक्टर शेतीयोग्य जमीन व ५२ गावठाणे भुसंपादित करुन महाराष्ट्र राज्य वीज मंडळाला हस्तांतरीत करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९८० मध्ये जमिनी व गावठाणे ताब्यात घेतल्यानंतर प्रकल्पग्रस्तांना दिलेली आश्वासने शासनाने व वीज कंपनीने पुर्ण केली नसल्याने प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महानिर्मिती कंपनीतर्फे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामुळे बाधित झालेल्या एकूण प्रकल्पग्रस्तापैंकी ७८% प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीच्या सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील आगामी वर्षातील रेडीरेकनरचे दर ठरविण्यासंदर्भात

**(१२०) * १३६३९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगामी वर्षातील रेडीरेकनरचे दर ठरविण्यासंदर्भात दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम क्षेत्रातील मंत्री आणि मुंबईत विक्रीविना पडून असलेली लाखो घरे यामुळे यावर्षी रेडीरेकनर दरात वाढ करु नये अशी आग्रही मागणी मुंबईतील लोकप्रतिनिधींनी सदर बैठकीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आयोजित मा.लोकप्रतिनिधी यांच्या समवेतच्या बैठकीमध्ये वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दर वाढवू नयेत, सर्वसाधारण १०% वाढ असावी, ८०० चौ. फूटा वरील सदनिकांचे दर वाढवावेत इ. संमिश्र सूचना केल्या आहेत.

(३) व (४) महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे खरे बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम १९९५ अन्वये वार्षिक मूल्यदर तक्ते तयार करण्यात येतात. या नियमातील तरतूदी, वर्षात नोंदविण्यात आलेल्या खरेदी विक्री व्यवहारांचे सरासरी दर, संबंधित मूल्य विभागाचे गुणदोष, बाजारातील प्रचलित दर, मालमत्तांचे प्रदर्शना मधील दर, चौकशी इ. बाबींची पडताळणी करुन सुधारित दर अंतिम करण्याचे काम मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावर अंतिम टप्प्यात असून त्यांचेकडून सदर दरतक्ते दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी निर्गमित करण्यात येतील.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**नागपूर.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.